www.yuvakadhar.in
E mail - dainikyuvakaadhar@gmail.com
facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी




मुख्य संपादक - भारती संतोष आमले उपसंपादक - श्री विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री जगन्नाथ रासवे निवासी संपादक- श्री राकेश जनार्दन पाटील सह संपादक - मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 359 रविवार दि. 14 सप्टेंबर २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : 6 RNI MAHMAR/2023/89514

## दिबा पाटील विमानतळ नामकरणाच्या रॅली आंदोलनात पनवेल, उरण- बेलापूरच्या भाजप आमदारांनी सहभागी व्हावे-शेकाप नेते- राजेंद्र पाटील

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

30 सप्टेंबर पासून सुरू होत असलेल्या विमानतळाला दि. बा. पाटील यांचे नाव देण्यात यावे अशी मागणी येथील प्रकल्पग्रस्तांची, स्थानिकांची आहे. यासाठी 14 सप्टेंबर रोजी रॅली काढून आंदोलन केले जाणार आहे. दिबा पाटील जन्मशताब्दी वर्षानिमित्त जासई येथे काढण्यात येणाऱ्या कार रॅलीत पनवेल, उरण, बेलापूरच्या भाजप आमदारांनी सहभागी व्हावे असे आवाहन शेकाप नेते राजेंद्र पाटील यांनी केले. पनवेल- नवी मुंबई परिसरात होणाऱ्या विमानतळाला दिबा पाटील यांचे नाव मिळावे यासाठी अनेक मोर्चे, आंदोलने, बाईक रॅली काढण्यात आली. राज्य सरकारने याबाबतचा प्रस्ताव केंद्राकडे पाठवलेला आहे. मात्र अद्यापही विमानतळाला दिबा पाटील यांचे नाव दिले नाही त्यामुळे स्थानिक प्रकल्पग्रस्त नाराज आहे. दिबांच्या नावासाठी प्रकल्पग्रस्त बलिदान देण्यास देखील तयार आहेत. 14 सप्टेंबर रोजी येथे मोठ्या प्रमाणात वाहन रॅली काढण्यात येणार आहे. माणकोली नाका येथून या रॅलीला सुरुवात होणार असून जासईपर्यंत ही कार रॅली येणार आहे. प्रकल्पग्रस्त, ग्रामस्थ तसेच पनवेल, उरण,



बेलापुरच्या आमदारांनी देखील यात सहभागी व्हावे असे आवाहन शेकाप नेते राजेंद्र पाटील यांनी केले आहे.

## मणिपूरमध्ये शांतता, समृद्धीचे लक्ष्य; हिंसाचारापासून दूर राहण्याचे पंतप्रधान मोदींचे आवाहन

विविध संघटनांना हिंसाचारापासून दूर राहण्याचे आवाहन करताना, केंद्र सरकार मणिपूरमधील जनतेच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे आश्वासन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी येथे दिले. मणिपूरसारख्या संघर्षग्रस्त राज्याला शांतता आणि समृद्धीचे प्रतीक बनवण्याच्या ध्येयासाठी काम करत असल्याचेही पंतप्रधान मोदी यांनी नमूद केले. मणिपूरमध्ये मे २०२३ मध्ये वांशिक हिंसाचार उफाळल्यानंतर या राज्याच्या पहिल्याच भेटीत कुकी-बहुल चुराचांदपूर जिल्ह्यातील एका जाहीर सभेला पंतप्रधान मोदी यांनी संबोधित केले. प्रदीर्घ वांशिक हिंसाचारग्रस्त मणिपूरला भेट न दिल्याबद्दल पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यावर विरोधी पक्षांनी तीव्र टीका केली आहे. हाच धागा पकडत मोदी यांनी केंद्र सरकार या भागाच्या शांततेसाठी करत असल्याच्या प्रयत्नांचा उल्लेख केला.

'मणिपूर ही आशा आणि आकांक्षांची भूमी आहे. दुर्दैवाने या सुंदर प्रदेशावर हिंसाचाराची सावली पडली', असे मोदी म्हणाले. 'विकासासाठी शांतता आवश्यक आहे. गेल्या ११ वर्षांत ईशान्येकडील राज्यांतील अनेक संघर्ष आणि वाद सोडवले गेले. यानंतर येथील लोकांनी शांतीचा मार्ग निवडला, तसेच विकासाला प्राधान्य दिले, असे मोदी यांनी स्पष्ट केले. 'मणिपूरच्या नावात 'मणि' आहे. येणाऱ्या काळात हे रत्न संपूर्ण इशान्य भारतासाठी चमकणार आहे. केंद्र सरकार मणिपूरला विकासाच्या मार्गावर पुढे नेण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे. या प्रयत्नांचा एक भाग म्हणून मी आज तुमच्या सर्वांमध्ये आहे', असे मोदी यांनी सांगितले.

**तुमचा राजधर्म कुठे आहे ? : काँग्रेस**

'मोदी यांनी मणिपूरमध्ये स्वतःच्या स्वागतासाठी भव्य सोहळा आयोजित केला. मोदी यांची ही कृती येथील पीडितांच्या जखमेवर मीठ चोळल्याचा प्रकार आहे,' अशी टीका काँग्रेस अध्यक्ष मल्लिकार्जून खरगे यांनी केली. 'तुमच्या स्वतःच्या शब्दात तुमचा राजधर्म कुठे आहे?' असा प्रश्नही खरगे यांनी 'एक्स'वरून मोदींना केला. मोदी यांच्या दोन वर्षे उशिराने झालेल्या मणिपूर दौऱ्यावर लोकसभेतील काँग्रेसचे उपनेते गौरव गोगोई यांनी शनिवारी टीका केली. तसेच मोदींचा हा दौरा येथील नागरिकांऐवजी स्वतःच्या प्रतिमेवर जास्त भर देणारा होता, असा आरोपही गोगोई यांनी केला.

**मतपेढीच्या राजकारणाचा ईशान्येला फटका : मोदी**

ऐझवाल (मिझोरम): 'पूर्वीच्या मतपेढीच्या राजकारणामुळे ईशान्येकडील राज्यांना मोठा त्रास सहन करावा लागला. परंतु आता केंद्रातील भाजपच्या नेतृत्वाखालील सरकारच्या प्रयत्नांमुळे हा भाग देशाच्या विकासाचे इंजिन बनत आहे, असे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी सांगितले. २०१४ मध्ये पंतप्रधान झाल्यानंतर मिझोराम येथील शनिवारच्या दुसऱ्या भेटीदरम्यान मोदींनी नऊ हजार कोटी रुपयांच्या प्रकल्पांचे उद्घाटन केले.

**हिंसाचारग्रस्त नागरिकांशी संवाद**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी शनिवारी मणिपूरमधील वांशिक हिंसाचारामुळे विस्थापित झालेल्या कुकी आणि मैतेई या दोन समुदायातील नागरिकांशी संवाद साधला. मोदी यांनी इंफाळमधील ऐतिहासिक कांगला किल्ला संकुल आणि चुराचांदपूरमधील शांतता मैदानावर विस्थापित व्यक्तींच्या समस्या ऐकल्या. तसेच राज्यात शांतता पुनर्स्थापित करण्यासाठी केंद्र सरकार प्रयत्न करत असल्याचे आश्वासन दिले, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

मी मणिपूरमधील सर्व संघटनांना शांततेच्या मार्गावर पुढे जाण्याचे आणि त्यांची स्वप्ने पूर्ण करण्याचे आवाहन करतो. सरकार मणिपूरच्या लोकांबरोबर आहे. आम्ही मणिपूरला शांती, समृद्धी आणि प्रगतीचे प्रतीक बनवण्याच्या ध्येयाकडे काम करत आहोत. – नरेंद्र मोदी, पंतप्रधान

मोदीजी, मणिपूरमध्ये तुमचा तीन तासांचा दौरा हा एक प्रकारचा विनोद, प्रतीकात्मक अपमान आहे. आज इम्फाळ आणि चुराचांदपूरमध्ये तुमचा तथाकथित 'रोड शो' म्हणजे मदत छावण्यांमधील नागरिकांच्या ओरडण्यापासून पळून जाण्यापेक्षा दुसरे काहीही नाही. – मल्लिकार्जुन खरगे, अध्यक्ष, काँग्रेस




## 17 सप्टेंबर रोजी पनवेल काँग्रेसतर्फे जन आक्रोश बाईक रॅली



**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

17 सप्टेंबर रोजी पनवेल काँग्रेस तर्फे तळोजा ते पनवेल काँग्रेस भवनपर्यंत जन आक्रोश बाईक रॅली काढण्यात येणार आहे. यावेळी सरकारचा निषेध केला जाणार असल्याची माहिती पनवेल युवक काँग्रेसचे जिल्हाअध्यक्ष हेमराज म्हात्रे यांनी दिली. पनवेल काँग्रेस भवन येथे मतदान चोरी आणि संघटने संदर्भात आढावा बैठकीचे आयोजन १३ सप्टेंबर रोजी करण्यात आले होते. या बैठकीला प्रमुख पाहुणे म्हणून महाराष्ट्र प्रदेश युवक सचिव आणि जिल्हा प्रभारी आनंद दुबे, यांच्यासह महापालिका जिल्हा अध्यक्ष सुदाम पाटील, माजी नगरसेविका निर्मला म्हात्रे, पनवेल युवक जिल्हाध्यक्ष हेमराज म्हात्रे, अभिजीत पाटील, विश्वजीत पाटील यांच्यासह अनेक जण उपस्थित होते. यावेळी आनंदकुमार दुबे यांनी भाजप सरकारवर निशाणा साधत मत चोरीचा आरोप केला. तसेच या विरोधात काँग्रेसचे राहुल गांधी यांनी आवाज उठवला असून त्यांनी राज्य सरकार आणि केंद्र सरकारवर आरोप केले. पालिका जिल्हाध्यक्ष सुदाम पाटील यांनी पनवेलमध्ये देखील अशाच प्रकारची दुबार मतदान झाले असल्याचे सांगत निवडणूक अधिकाऱ्यांनी ही नावे डिलीट करावेत असे सांगितले. काँग्रेसचे हेमराज म्हात्रे यांनी या भाजप सरकार विरोधात 17 सप्टेंबर रोजी तळोजापासून सुरू होणाऱ्या जनआक्रोश रॅलीबाबत माहिती दिली. तळोजा, खारघर, कामोठे, कळंबोली, नवीन पनवेल, पनवेल येथे ही रॅली येणार असल्याचे सांगितले. भाजप सरकार विरोधात ही जन आक्रोश बाईक रॅली असून या रॅलीमध्ये नागरिकांनी सहभागी व्हावे असे आवाहन हेमराज म्हात्रे यांनी केले आहे.



## जिल्हा परिषद हिंगोली ( बांधकाम विभाग) येथे वंचित बहुजन आघाडीच्या पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी केले 3 तास कार्यकारी अभियंता यांच्या दालनात ठिय्या आंदोलन..



**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी योगेश चौदंते**
अखेर संबंधित अधिकाऱ्यांनी १६ सप्टेंबर २०२५ रोजी बऊर येथील कामांची जायमोका चौकशी करण्यात येईल, असे लेखी आश्वासन दिल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले, 22 सप्टेंबर 2025 रोजी बोंबाबोंब आंदोलन... कळमनुरी तालुक्यातील बऊर येथील जिल्हा परिषद अंतर्गत करण्यात आलेल्या रस्त्याच्या कामात मोठ्या प्रमाणावर गैरप्रकार होऊन शासनाची लाखो रुपयांची फसवणूक झाल्याची तक्रार, तसेच दलित वस्तीतल्या कामांमध्ये भ्रष्टाचार, जिल्हा परिषद शाळेच्या बांधकामातील अनियमितता व नियमबाह्य कामांबाबतच्या चौकशा अनेक महिन्यांपासून प्रलंबित आहेत. कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग जाणीवपूर्वक दोषींना वाचवण्याचा प्रयत्न करीत असून चौकशी व कारवाई होत नाही. पूर्णतः सदरील तक्रारीकडे दुर्लक्ष केल्या जात आहे. याच कारणाने वंचित बहुजन आघाडीचे कार्यकर्ते अनेक वेळा भेटीसाठी गेले असताना सुद्धा कार्यकारी अभियंता बाहेरील दौऱ्यावर राहत असून भेट होत नाही. आज याच संतापाने आक्रमक भूमिका घेतली व याच कारणास्तव वंचित बहुजन आघाडीने चक्क कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग यांच्या दालनात 3 तास ठिय्या आंदोलन केले. शेवटी 16 संप्टेंबर 2025 रोजी जायमोका चौकशी व त्वरित कारवाई होईल असे लेखी आश्वासन मिळाल्यानंतर आंदोलन मागे घेण्यात आले,तेच या दिवशी चौकशी न झाल्यास 22 सप्टेंबर 2025 रोजी बोंबाबोंब आंदोलनाचा इशारा देण्यात आला. यावेळी कळमनुरी वंचित बहुजन आघाडीचे तालुकाध्यक्ष राजू कांबळे, संतोष इंगोले ( युवा ता.महासचिव), जयभीम डोंगरे ( युवा ता.सचिव),बऊर शा.सचिव दादाराव खंदारे, शाखाध्यक्ष अमोल खंदारे,बापूराव महाजन, मुकींदा ढेपे, समाधान पाईकराव व इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## विभागात तीन टप्प्यात 'सेवा पंधरवडा ; अनुकंपा व सरळसेवेतील २ हजार उमेदवारांना नियुक्तीपत्र - विभागीय आयुक्त बिदरी

### सर्वोत्तम तीन जिल्ह्यांची होणार निवड प्रत्येक जिल्ह्यात दोन नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणार

**दैनिक युवक आधार**
**सतीश कडू संपादक नागपूर विभाग**
**नागपूर ,दि.१३:** छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसापासून राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीपर्यंत १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर २०२५ दरम्यान नागपूर विभागातील सर्व जिल्ह्यांमध्ये विविध उपक्रम राबवून तीन टप्प्यात 'सेवा पंधरवडासाजरा होणार आहे. विभागातील अनुकंपा तत्वावरील गट 'क'आणि गट 'ड' पदांसाठी १२५० तर सरळसेवेद्वारे लिपीक पदावरील ६७५ उमेदवरांना पंधरवडया दरम्यान नियुक्तीपत्र देण्यात येणार आहे.सेवा पंधरवडयातील उपक्रमांची प्रभावी अमंलबजावणी करणाऱ्या तीन सर्वोत्तम जिल्ह्यांची निवड करण्यात येणार असल्याची माहिती, विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांनी आज येथे दिली.

सेवा पंधरवडया निमित्त विभागात राबविण्यात येणाऱ्या विविध उपक्रमांची माहिती विभागीय आयुक्त श्रीमती बिदरी यांनी पत्रकार परिषदेत दिली. लोकाभिमुख,पारदर्शक व कार्यक्षम महसूल प्रशासनाच्या माध्यमातून नागरिकांना दिलासा देण्याच्या उद्देशाने महसूल व वने विभागामार्फत विभागात १७ ते २२ सप्टेंबर, २३ ते २७ सप्टेंबर आणि २८ सप्टेंबर ते २ ऑक्टोंबर अशा तीन टप्प्यात विविध उपक्रम राबविण्यात येणार असल्याचे त्यांनी सांगितले.

पहिल्या टप्प्यात पाणंद रस्त्यांबाबत विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे.याअंतर्गत गावांच्या पाणंद किंवा शिवरस्त्यांचे सर्वेक्षण करणे व त्यांना क्रमांक देण्याचे काम प्राधान्याने करण्यात येणार आहे.यासोबतच नोंद नसलेल्या रस्त्यांची नोंद घेण्याचे आणि शेतरस्त्यांच्या सीमांकन व रस्त्यांविषयीच्या तक्रारींचे निराकरण करण्याकरिता सीमांकन व रस्ता अदालतांचे आयोजन करण्यात येणार आहे.

दुसऱ्या टप्प्यात'सर्वांसाठी घरे' उपक्रम राबविण्यात येणार आहे. उपक्रमांतर्गत 'सर्वांसाठी घरे' या शासकीय निर्णयाची प्रभावी अंमलबजावणी करून बेघरांना घर देण्याचे उद्दिष्टय ठेवण्यात आले आहे. शासकीय जमिनीवर गृहनिर्माणासाठी कब्जाहक्काने जमीन वाटप करणे, झोपडपट्टी व इतर अनधिकृत बांधकामांचे नियमशीरकरण करणे आणि पात्र लाभार्थ्यांना पट्टेवाटप करण्यात येणार आहे.

पंधरवडयाच्या तिसऱ्या टप्प्यात प्रत्येक जिल्ह्याला नाविन्यपूर्ण उपक्रम राबविण्याचे उद्दिष्टय देण्यात आल्याचे श्रीमती बिदरी यांनी सांगितले. याअंतर्गत नागपूर जिल्ह्यात १ व २ ऑक्टोबर रोजी शेतकऱ्यांच्या समस्या सोडविण्यासाठी मंडळस्तरावर 'समाधान दिवस' आयोजित करण्यात येणार आहे. तर २९ व ३० सप्टेंबर रोजी प्रत्येक गावांमध्ये संजय गांधी निराधार योजनेच्या लाभार्थ्यांना डिबीटीचा लाभ देण्यात येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी विशेष शिबीर आयोजित करण्यात येणार आहे.

वर्धा जिल्ह्यात विशेष उपक्रमांतर्गत वनहक्क धारकांना सर्व शासकीय योजनांचा लाभ देण्याबाबत जनजागृती करून लाभ देण्याबाबत कार्यवाही करण्यात येणार आहे. तसेच जिल्ह्यातील ७/१२ जीवंत करण्याबाबत कार्यवाही करण्यात येणार आहे.विशेष उपक्रमांतर्गत भंडारा जिल्ह्यात 'लक्ष्मी मुक्ती' ही अभिनव योजना राबविण्यात येणार आहे. याअंतर्गत शेतीच्या अभिलेख्यांवर पत्नीचे नाव नोंदविण्यात येणार आहे.यासोबतच दिव्यांग लाभार्थ्यांना घरपोच धान्य वाटप करण्याचा उपक्रमही राबविण्यात येणार आहे.

गोंदिया जिल्ह्यात विशेष उपक्रमांतर्गत 'लक्ष्मी मुक्ती' योजना राबविण्यात येणार असून अंत्योदय व प्राधान्य कुटुंब लाभ योजनेंतर्गत दिव्यांग लाभार्थ्यांना घरपोच धान्य वाटप करण्यात येणार आहे. चंद्रपूर जिल्ह्यात विशेष उपक्रमांतर्गत चुकून वर्ग २ झालेल्या शेतजमिनींचे प्रकरणे निकाली काढण्यात येणार आहे. तसेच, जिल्ह्यातील गावांमध्ये गावकरी व स्थानिक प्राधिकरणाने मागणी केल्यानुसार स्मशानभूमीकरिता जागा उपलब्ध करून देण्याची मोहीम राबविण्यात येणार आहे.विशेष उपक्रमांतर्गत गडचिरोली जिल्हयात महसूल मंडळ निहाय शाळा व महाविद्यालयांमध्ये शिबीर आयोजित करून शैक्षणिक प्रमाणपत्र वितरीत करण्यात येणार असून लक्ष्मी मुक्ती योजनेचीही अमंलबजावणी करण्यात येणार आहे.

**२ हजार उमेदवारांना पालकमंत्र्यांच्या हस्ते नियुक्तीपत्र**

नागपूर विभागातील ६ जिल्ह्यांमधील अनुकंपा तत्वावरील रिक्त जागा भरण्याची महत्वाची कार्यवाही सेवा पंधरवडयामध्ये २५ ते ३० सप्टेंबर दरम्यान होणार आहे.यानुसार गट 'क' च्या ४२४ आणि गट 'ड' च्या ८२६ अशा एकूण १२५० तसेच महाराष्ट्र लोकसेवा आयोगाकडून निवड झालेल्या विभागातील ६७५ लिपीक प्रवर्गातील उमेदवारांना पालकमंत्री यांच्या हस्ते नियुक्ती पत्र प्रदान करण्यात येणार आहे.

**सर्वोत्तम तीन जिल्ह्यांची होणार निवड**

'सेवा पंधरवडा' दरम्यान नियोजित कार्यक्रम व उपक्रमांची उत्कृष्ट अंमलबजावणी करणाऱ्या तीन जिल्ह्यांची निवड करण्यात येणार आहे. या सदर्भातील पर्यवेक्षणासाठी विभागीय आयुक्तालयातील अधिकाऱ्यांची जिल्हा निहाय संपर्क अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे.नागपूर जिल्हयासाठी प्रादेशिक विभागीय चौकशी अधिकारी दिपाली मोतियेळे,भंडारासाठी सह आयुक्त (पुनर्वसन) प्रदीप कुलकर्णी, वर्धा जिल्ह्यासाठी अपर आयुक्त (महसूल) राजेश खवले, चंद्रपूरसाठी अपर आयुक्त (सामान्य प्रशासन) तेजूसिंग पवार, गडचिरोलीसाठी सह आयुक्त (रो.ह.यो.) अविनाश हरगल आणि गोंदियासाठी सह आयुक्त (करमणूक) तुषार मठकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. विविध मानकांवर सरस कामगिरी करणाऱ्या तीन जिल्ह्यांची नावे विभागीय आयुक्त कार्यालयाद्वारे मुख्यालयास पाठविण्या येणार असून यातील एका जिल्हयाची सर्वोत्कृष्ट जिल्हा म्हणून निवड करण्यात येणार असल्याचे विभागीय आयुक्त श्रीमती बिदरी यांनी सांगितले.

# महसूल सेवकांना चतुर्थश्रेणी कर्मचा-यांचा दर्जा द्या अन्यथा बेमुदत धरणे आंदोलन

### चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचे तहसीलदार दारव्हा यांना निवेदन

**दैनिक युवक आधार.**
**तालुका प्रतिनिधी किशोर कांबळे दारव्हा**
**दारव्हा** : शासनाचा महत्वाचा कणा असलेल्या महसूल सेवकांना चतुर्थ श्रेणी कर्मचाऱ्यांचा दर्जा देण्यात यावा. अन्यथा बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येईल. असा इशारा महसूल सेवक यांनी तहसीलदार यांना दिलेल्या निवेदनातून दिलेला आहे. महसूल सेवक हा महसूल विभागाचा कणा आहे. राज्याची विविध शासकीय धोरणे, उपाययोजना, शासन ते ग्रामपातळीवरील महत्वाच्या योजना, तसेच केंद्र शासनाच्या राज्यात सुरु असलेल्या महत्वाच्या योजना इत्यादीची अंमलबजावणी अंतिम घटकापर्यंत पोहोचवण्याची जबाबदारी महसूल यंत्रणा ज्यात जिल्हाधिकारी ते महसूल सेवक स्तरापर्यंत कार्यरत असतात. महसूल विभाग हा राज्य शासनाचा क्षेत्रीय योजना राबविणारा सर्वात प्रमुख विभाग आहे. महसूली कामासोबतच विविध प्रमाणपत्रे देणे,

**जनतेच्या दैनंदिन**

गरजांशी निगडित असलेला हा विभाग आहे. त्यामुळे शासनाची प्रतिमा प्रतिबिंबीत करणारा हा विभाग आहे. २४ तास वेगवेगळ्या सेवा देणाऱ्या या महसूल सेवाकांना शासनाच्या वर्गीकृत कर्मचाऱ्याप्रमाणे
सेवा सुविधा लागू केलेल्या नाही. त्यामुळे या महसूल सेवकांवर अन्याय होत आहे. या महसूल सेवक पदाचे यंत्रनेतील स्थान आणि




कार्य लक्षात घेता महसूल सेवक यांना इतर महसूल कर्मचाऱ्यांप्रमाणे शासकीय सेवा सुविधा देण्यासाठी चतुर्थ श्रेणीचा दर्जा देऊन महसूल कर्मचारी म्हणून सामावून घेण्यात यावे. अन्यथा 12 सप्टेंबर पासून टप्पाटप्प्याने बेमुदत धरणे आंदोलन करण्याचा इशारा महसूल सेवकांनी तहसीलदार दारव्हा यांना दिला.

महसुल सेवक (कोतवाल) यांचे कामाचे स्वरुप व्यापक आहे.
नैसर्गिक आपत्ती मध्ये नदी , नाल्या काठी ,रात्रपाळी मध्ये काम करावे लागते,
ग्राम महसुल अधिकारी कार्यालय परिसर स्वच्छता करावी लागते.
संजय गांधी विभागातील लाभार्थ्यापर्यन्त डीबिटी बाबत माहिती देणे किंवा त्या विभागात आपली ड्युटी करावी लागते.
zero pendancy ची पूर्ण कामे करावी लागतात,
राष्ट्रीय सण पताका लावणे,चुना आखणे कार्यक्रमाची किरकोळ तयारी करावी लागते.
शिपाई संवर्गाची पदे रिक्त असल्याने जिल्हाधिकारी ऑफिस पासून तहसिल पर्यन्त शिपाई सवर्गाची सर्व कामे करावी लागतात,
तलाठी कार्यालयातील सर्व कामे करावी लागतात,
ई पीक पाहणी करावी लागते,
पीक नुकसान पंचनामे करिता पूर्ण शेत शीवारावर अधिकार्यांसोबत फिरावे लागते.
शासकीय पंच म्हणून काम करावे लागते पोलिस स्टेशनला.
महसूल वसुली करावी लागते,फेरफार नोटीस तामिल करावी लागते खातेदार यांचे घरी जाऊन.
गावात प्रत्येक योजना ही लोकाभिमुख करावी लागते म्हणजे प्रसिद्धी करावी लागते दवंडी द्यावी लागते.
रेतिघाट रात्र ड्युटी,
प्रत्येक शासकीय योजनेची दवंडी देणे.महसूली कामांची जबाबदारी या महसूल सेवकांवर सोपवली जाते.
यावेळी तालुका अध्यक्ष श्री. महेश सुरेशराव पाटिल, उपाध्यक्ष श्री. अभिनंदन शिरसाठ, सचिव श्री. ज्ञानेश्वर चंदनसे,जिल्हा सचिव श्री प्रशांत प्रभाते, वैभव दुधे, भुमिका लाड,जिल्हा प्रसिद्धी प्रमुख श्री किरण मोरे, जयश्री वाघाडे, स्वाती राठोड, महेश घोडाम, अभया सरके, किरण चव्हाण, शुभम गावंडे, रवी मोडक, अमिन खाँ पठान, निलेश तायडे, आश्विन बळकार इ. महसुल सेवक उपस्थित होते.

## लोकनेते रामशेठ ठाकूर मोखाडा महाविद्यालयाला "सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार" जाहीर; मुंबई विद्यापीठाकडून सन्मान

**दैनिक युवक आधार**
**पनवेल (प्रतिनिधी)**



मुंबई विद्यापीठाने 'सर्वोत्कृष्ट ग्रामीण महाविद्यालय' पुरस्कारासाठी मोखाडा येथील रयत शिक्षण संस्थेच्या लोकनेते रामशेठ ठाकूर कला, विज्ञान आणि वाणिज्य महाविद्यालयाची निवड जाहीर केली आहे. उच्च दर्जाचे शिक्षण आणि ग्रामीण भागात शिक्षण क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल महाविद्यालयाला हा पुरस्कार प्रदान करण्यात येणार आहे. या पुरस्काराचे वितरण सोमवार दिनांक १५ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता मुंबई विद्यापीठाच्या कलिना कॅम्पसमधील ग्रीन टेक्नॉलॉजी ऑडिटोरियम येथे एका विशेष समारंभात होणार आहे. तसे पत्र मुंबई विद्यापीठाचे रजिस्टार डॉ. प्रसाद कारंडे यांनी महाविद्यालयाला दिले आहे. थोर देणगीदार तसेच महाविद्यालयाचे विकास समितीचे प्रमुख व रयत शिक्षण संस्थेचे ज्येष्ठ मॅनेजिंग कौन्सिल सदस्य माजी खासदार लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मोखाडा महाविद्यालयाच्या विकासासाठी मोठे योगदान दिले आहे. या ठिकाणी दर्जेदार शिक्षण विद्यार्थ्यांना मिळत आहे, त्या अनुषंगाने या महाविद्यालयाने प्रगती साधली. अत्यंत दुर्गम भागात असलेल्या या परिसरात विद्यार्थ्यांची तसेच शिक्षक आणि पालकांची मोठी गैरसोय होती. सोयीसुविधांपासून वंचित राहावे लागत होते. त्यामुळे प्रज्ञावंत विद्यार्थ्यांना अडचण भासत होती. आदिवासीबहूल परिसरात १९८४ साली स्थापन झालेल्या या विद्यालयाला उंच भरारी देण्याचे काम लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी केले. लोकनेते रामशेठ ठाकूर यांनी मोखाडा विद्यालयाला भेट दिली त्यावेळी त्यांनी येथील परिस्थिती बदलवून येथील विद्यार्थ्यांना मुख्य प्रवाहात आणण्याचा निश्चय केला. दुर्गम भागातील विद्यार्थी सक्षम झाला पाहिजे हि लोकनेते रामशेठ ठाकूर यांची कायम तळमळ राहिली आहे त्यामुळे त्यांनी ताबडतोब कार्यवाही केली आणि प्रत्यक्षात निश्चय पूर्ण करीत मोखाडा परिसरातील विद्यार्थ्यांसाठी भव्य स्वरूपात महाविद्यालयाची इमारत साकारली. आज या ठिकाणी दुर्गम भागातील वाडी वस्तीतील विद्यार्थी दर्जेदार शिक्षण घेत आहेत. त्यानुसार उच्च दर्जाचे शिक्षण आणि ग्रामीण भागात शिक्षण क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल मुंबई विद्यापीठाकडून लोकनेते रामशेठ ठाकूर मोखाडा महाविद्यालयाला "सर्वोत्कृष्ट महाविद्यालय पुरस्कार" जाहीर झाला आणि हि बाब रयत शिक्षण संस्था व महाविद्यालयासाठी अभिमानास्पद सन्मानाची आहे.

## परतूर–मंठा येथे सेवा पंधरवडा निमित्त मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान कार्यशाळा संपन्न.

### गावोगावी विकास आराखडा,पारदर्शकता आणि जनसहभागावर देणार भरआ. बबनराव लोणीकर

**दैनिक युवक आधार**
**जालना (अशोक ठोके)**
सेवा पंधरवाडा निमित्त जिल्हा परिषद जालना तर्फे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान २०२५ अंतर्गत कार्यशाळांचे आयोजन करण्यात आले होते, या कार्यशाळांना माजीमंत्री तथा परतूरचे आमदार बबनराव लोणीकर उपस्थित होते. सकाळी दहा वाजता परतुर येथील भारतरत्न अटल बिहारी वाजपेयी नाट्यगृहात परतुर पंचायत समिती व जालना पंचायत समितीअंतर्गत नेर व सेवली गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, विस्तार अधिकारी, ग्रामपंचायत अधिकारी व शासकीय यंत्रणा यांच्यासाठी कार्यशाळा पार पडली. या कार्यक्रमास मोठ्या संख्येने नागरिकांची उपस्थिती होती. यानंतर दुपारी बारा वाजता मंठा तालुक्यातील वैशाली मंगल कार्यालयात कार्यशाळा झाली. मंठा पंचायत समितीअंतर्गत येणाऱ्या सर्व ग्रामपंचायतींचे सरपंच,



उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य व अधिकारी हे या कार्यशाळेत सहभागी झाले होते.

**मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानाची माहिती**

राज्य शासनाने राबविलेले मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान हे ग्रामविकासासाठी अत्यंत महत्त्वाचे पाऊल मानले जाते. या अभियानाचे मुख्य उद्दिष्ट म्हणजे – गावोगाव विकास आराखडा तयार करणे. ग्रामपंचायतींच्या कामकाजात पारदर्शकता आणणे. जनतेचा थेट सहभाग निश्चित करणे. विविध योजनांचे एकत्रित व परिणामकारक नियोजन करणे. या माध्यमातून ग्रामपातळीवरील पायाभूत सुविधा, शिक्षण, आरोग्य, पाणीपुरवठा, महिला व बालविकास, स्वच्छता, शेतीविकास यासारख्या महत्वाच्या क्षेत्रांना चालना मिळणार आहे. शासनाचे उद्दिष्ट "आत्मनिर्भर गाव, सशक्त पंचायत राज" घडविणे हेच आहे.

**ललोकप्रतिनिधी व ग्रामपंचायतींचा सहभाग महत्त्वाचा**

या कार्यशाळांमधून पंचायत राज व्यवस्थेतील पदाधिकारी, अधिकारी व ग्रामस्थांना योजनांची सविस्तर माहिती दिली जाणार आहे. गावांच्या गरजांनुसार ठोस आराखडे तयार करून त्यांची अंमलबजावणी गतीमान करण्याचे मार्गदर्शन केले जाणार आहे. आमदार बबनराव लोणीकर यांच्या उपस्थितीमुळे परतुर व मंठा तालुक्यातील ग्रामपंचायतींना विकास आराखड्याच्या दृष्टीने प्रेरणा मिळेल, अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

**दैनिक युवक आधार** हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.

daily YUVAK ADHAR Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

## महाराजा मंगल कार्यालयात बँकांचे शिबिर ; प्रमुख १२बँकांचा सहभाग

**दैनिक युवक आधार**
**खोपोली वार्ताहर**

भारत सरकारच्या वित्त विभागाच्या निर्देशानुसार शुक्रवारी खोपोली शहरात महाराज मंगल कार्यालयाच्या सभागृहात बँकाचे शिबिर आयोजित करण्यात आले होते. या शिबिरात शहरातील जवळपास बारा प्रमुख बँकांनी भाग घेतला. या कार्यक्रमात नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतलेला पहायला मिळाला.
जनधन योजनेंतर्गत बँक खाते काढणे आणि आधी काढलेल्या जनधन खात्यांची केवायसी करणे तसेच शासनाच्या
योजनाची माहिती खातेदार नागरिकांना देणे हा मुख्य उद्देश या शिबिराचा होता. या
शिबिरासाठी रिजर्व बँक ऑफ इंडियाचे एक्झिक्युटीव्ह डायरेक्टर नीरज निगम
प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. त्यांच्यासमवेत डॉ. ज्योती सक्सेना, डी.जी.एम. आर. बी. आय. यांच्यासह इतर
बँकाचे व्यवस्थापकीय अधिकारी उपस्थित होते. तसेच विजयकुमार कुलकर्णी, अग्रणी
जिल्हा प्रबंधक हे ही उपस्थित होते. उपस्थित सर्व मान्यवरांचे विक्रम साबळे फाउंडेशन च्या वतीने उद्योजक विक्रम साबळे यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन स्वागत व सन्मान करण्यात आले. या सर्व बँकिंग तज्ज्ञांनी विविध योजना व जनधन
खात्याबाबत उपस्थित खातेदारांना सविस्तर माहिती देत भारत सरकारच्या वित्त विभागाच्या ध्येय धोरणा बाबतीचा सदर उपक्रम संपन्न केला.



# स्वातंत्र्याच्या ७०वर्षा नंतर ही नायकडा आदीवासी समाज मुख्य प्रवाहाच्या कोसो-दूर

## नाईकडा समाजाला योजना द्या प्रकल्प अधिकारी पुसद यांना निवेदनाद्वारे मागणी

**दैनिक युवक आधार**
**उमरखेड तालुका प्रतिनिधी राजु गायकवाड**

उमरखेड तालुक्यात २० हजारपेक्षिाही अधिक लोकसंख्या अदिम जमातीतील नायकडा समाजाची आहे. मात्र, ही जमात निरक्षरता व अज्ञानामुळे शासकीय योजनांपासून दूर फेकल्या गेली. त्यामुळे विकासाच्या प्रवाहाबाहेर असलेल्या या जमातीला शासनाने पुन्हा प्रवाहात घ्यावे, अशी भावनिकमागणी नायकडा समाजाने केली आहे. युवा जिल्हाध्यक्ष अरुण तिलेवाड यांनी राज्याच्या आदिवासी मंत्र्यांना ३ सप्टेंबर रोजी मागण्यांचे निवेदन दिले आहे. तालुक्यातील कोर्टा, जवराळा, परोटी, थेरडी, सोनदाबी, दराटी, टाकळी, एकंबा, बंदी टाकळी



अशा विविध गावांमध्ये नायकडा आदिवासी जमात राहाते. आजही ही जमात आपली परंपरा, रीतीरिवाज, देवदेवता व सण-उत्सव जपते आहे. भीमदेव, सागदेव यासारखे पारंपरिक उत्सव साजरे करताना ते स्वतंत्र बोलीभाषा वापरतात. हा समाज साधा, भोळा, कष्टाळू आणि निसर्गपूजक असला तरी त्यांच्या आयुष्यातील संघर्ष मात्र अंतहीन आहे. शिक्षणाचा अभाव, व्यसनाधीनतेचे संकट, दुष्काळी शेती, नैसर्गिक आपत्ती आणि रोजगारासाठी होणारे स्थलांतरणामुळे या समाजाला मुख्य प्रवाहापासून दूर राहावेलागले आहे. अनेकांकडे आ व श्‍ य क का ग द प त्रे न स ल्‍ या ने शासकीय योजनांचा लाभ मिळत नाही. उपजीविकेसाठी गाव सोडून भटकंती करणारा हा समाज आजही उपेक्षित आहे. योग्य नेतृत्वाचा अभाव आणि शासनाच्या दारापर्यंत पोहोचू न शकलेली ही माणसे आजही न्यायाच्या प्रतीक्षेत आहेत. कोलाम आणि पारधी या जमातीप्रमाणे नायकडा समाजालाही आदिम जमातीचा दर्जा मिळावा, अशी मागणी आता होत आहे. त्यातूनच तिलेवाडयांनी आदिवासी मंत्र्यांना निवेदन दिले. त्यात शासकीय योजनांचा शंभर टक्केलाभ मिळावा, अशी मागणी केली. कोर्टा येथील नायकडा युवा समाज जिल्हाध्यक्ष तथा ट्रायबल फोरम तालुकाध्यक्ष अरुण तिलेवाड यांच्यासह युवा कार्यकर्ते वंदेश पिलवंड, अविनाश रणमले यांनी हे निवेदन पुसद येथील एकात्मिक आदिवासी प्रकल्प विभागाच्या अधिकाऱ्यांमार्फत आदिवासी विकासमंत्री डॉ. प्रा. अशोक उईके, राज्यमंत्री इंद्रनील नाईक, नाशिक येथील आदिवासी विकास विभागाचे आयुक्त, व अमरावतीच्या अपर आयुक्तांकडेपाठविले आहे.

# कांद्याचे दर घसरल्याने विंचूर येथे शेतकऱ्यांचा रास्ता रोको आंदोलन - दोन तास मार्केट बंद

**दैनिक युवक आधार**
**जनार्दन चव्हाण विंचूर प्रतिनिधी**

**विंचूर (दि. १३ सप्टेंबर) :** कांद्याच्या बाजारभावात मोठ्या प्रमाणात घसरण झाल्यामुळे उत्पादन खर्चही निघेना अशी स्थिती निर्माण झाली आहे. त्यामुळे अस्वस्थ झालेले शेतकरी अखेर रस्त्यावर उतरले. शनिवारी सकाळी साडेनऊ वाजता विंचूर येथील कांदा उपबाजार समितीसमोर शेतकऱ्यांनी संभाजीनगर-नाशिक महामार्गावर रास्ता रोको आंदोलन छेडत सरकारकडे तीव्र संताप व्यक्त केला. दरम्यान, या आंदोलनात शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. सध्या सरासरी कांद्याला २०० ते ३०० रुपये प्रति क्विंटल एवढा खालचा भाव मिळत आहे. तर दर्जेदार कांद्यालाही केवळ ८०० ते १००० रुपयांचा दर मिळत असल्याने शेतकरी संतप्त झाले आहेत. महागडे बियाणे खरेदी करून दुबार रोपवाटिका तयार करीत लागवड पूर्ण केलेल्या शेतकऱ्यांना मजुरांच्या टंचाईमुळे प्रचंड आर्थिक फटका बसला. मोठ्या मजुरीचे दर मोजून केलेल्या लागवडीचा खर्चही वसूल न होण्याची भीषण परिस्थिती निर्माण झाल्याने शेतकरी हतबल झाले आहेत. आंदोलनादरम्यान शेतकऱ्यांनी शासनाविरोधात घोषणाबाजी केली. "आमच्या कष्टाचे योग्य मूल्य द्या", "कांद्याला हमीभाव द्या" अशा घोषणा देत शेतकऱ्यांनी आपला रोष व्यक्त केला. अनेकांनी वाहतूक रोखून



सरकारचे लक्ष वेधून घेण्याचा प्रयत्न केला. कांद्याचे भाव घसरल्यामुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असून त्यांच्या जगण्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. यापुढे योग्य तो हमीभाव न दिल्यास आणखी तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा शेतकऱ्यांनी दिला आहे.

## रिसोड..... सदाशिव नगर मधील रस्त्याची अत्यंत दयनीय ... दुरावस्था

**दैनिक युवक आधार**
**. तालुका प्रतिनिधी. रणजीत सिंह ठाकुर रिसोड ....**

.मधील वार्ड क्रमांक 2 मधील अनंत कॉलनी च्या बाजूला असलेल्या सदाशिवनगर कॉलनीतील रस्त्याची अवस्था अगदी दयनीय झाली आहे याकडे कोणत्याही नगरपालिका सदस्य व नगरपालिकेचे लक्ष नाही त्यामुळे कॉलनीतील कॉलनी वासियांना हा नाहक त्रास सहन करावा लागत असून रस्त्यावर पाण्याची डबके साचली असून मच्छराचे प्रमाण वाढले असून कॉलनी वासीयांना या मच्छरापासून व लहान बाळांना आजार होण्याची शक्यता नाकारता येत नाही त्याचप्रमाणे त्या साचलेल्या डबक्यामुळे रह दुर्गंधी पसरत असून तेथील रहिवाशांना त्या त्रासाचा सामना करावा लागत आहे याकडे संबंधित नगर पालिका सदस्याने लक्ष देण्याची गरज असून या कॉलनीतील रहिवाशांची होणारी गैरसोय याकडे लक्ष देण्याची गरज असून नगरपालिके ने दाखल घेऊन कॉलनी वाशियांची समस्या सोडवावी अशी मागणी कॉलनी वासिया कडून होत आहे

## पाचलमधील रखडलेल्या कामासंदर्भात ग्रामीण पत्रकार संघ पालकमंत्र्यांना भेटणार

**दैनिक युवक आधार**
**राजापूरः- (प्रमोद तरळ)**

पाचल परिसरातील रखडलेल्या व वर्षानुवर्ष अपूर्णावस्थेत असलेल्या सार्वजनिक कामाच्या सद्यस्थिती बद्दल लोकांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे. यासाठी ज्येष्ठ पत्रकार नारायण पांचाळ यांच्या नेतृत्वाखाली पत्रकारांचे शिष्टमंडळ जिल्हयाचे पालकमंत्री ना.उदय सामंत व आमदार किरण सामंत यांना भेटणार आहे अशी माहिती पत्रकार संघाचे अध्यक्ष अंकुश पोटले व कार्याध्यक्ष सुरेश गुडेकर यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे

या पत्रकात पुढे म्हटले आहे की करक कारवली तिठा येथे बांधण्यात आलेल्या आरोग्य केंद्र इमारतींचे काम गेले वर्षभर अपूर्णावस्थेत आहे या आरोग्य केंद्र इमारतींचे रखडलेले काम त्वरित पूर्ण होणे आवश्यक आहे. तसेच पाचल ते अणुस्कुरा - पाचल - तळवडे, मूर हा महत्त्वाचा रस्ता असून या रस्त्यावरील प्रचंड वाहतूक, रहदारीच्या कारणामुळे हा रस्ता अतिशय खड्डेमय व नादुरुस्त झाला आहे.अनेक वर्षांपासून हा रस्ता बनवण्याची ग्रामस्थांची मागणी आहे
या कामाकडे दुर्लक्ष होत असल्याची जनतेची भावना आहे.तरी या रस्त्याच्या कामाला प्राधान्य देण्यात यावे.

# उदगीर नगर परिषद कर्मचारी यांच्याकडून भटक्या कुत्र्यांना पकडण्याची मोहीम सुरू

**दैनिक युवक आधार**
**उदगीर प्रतिनिधी बालाजी तेलंग :-**

शहरातील विविध भागात भटक्या कुत्र्यांचा उपद्रव वाढलेला आहे. या कुत्र्यांनी अनेकावर हल्ला करून चावा घेऊन गंभीर जखमी केले आहेत. मंगळवारी (दि. ९) रात्री शहरातील चौबारा परिसरात एका ३६ वर्षीय तरुणावर एका भटक्या कुत्र्याने जीवघेणा हल्ला करून तोंडाचे लचके तोडले आहे. शुक्रवारी (दि. १२) नगरपालिकेकडून शहरातील भटक्या कुत्र्यांची धरपकड मोहीम सुरू करण्यात आली आहे.
उदगीर शहरात अनेक भटक्या कुत्र्यांची संख्या असल्याची सांगितले जाते. शहरातील विविध भागात गल्लोगल्ली दिवसा-रात्री २० ते २५ कुत्रे झुंडीने फिरताना दिसून येत आहेत. या मोकाट कुत्र्यांनी लहान बालके, वयोवृद्ध व्यक्ती आणि अनेक नागरिकांवर अचानक हल्ले करून जखमी केल्याच्या अनेक घटना वारंवार घडत आहेत. मंगळवारी रात्री साडेनऊ वाजताच्या सुमारास शहरातील चौबारा परिसरात विजय चंद्रकांत वडजे यांच्यावर एका भटक्या कुत्र्याने अचानक हल्ला करून त्यांच्या तोंडाला चावा घेऊन गंभीर जखमी केले आहे. यामुळे शहरातील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.
दररोज सकाळी व सायंकाळी व्यायामासाठी, कामासाठी किंवा शाळेत जाणाऱ्या नागरिकांना आणि विद्यार्थ्यांना या भटक्या कुत्र्यांचा सामना करावा लागत आहे. याकडे नगरपालिका प्रशासनाने लक्ष देऊन बंदोबस्त करण्याची मागणी जनतेत . होत होती.
शुक्रवारी नगरपालिकेच्या वतीने शहरातील विविध भागात जाऊन नगरपरिषद येथील लोकांनी २५ ते ३० भटक्या कुत्र्यांना जाळीद्वारे पकडण्यात आले आहे. शहरात मोठ्या प्रमाणात भटक्या कुत्र्यांची संख्या वाढली असून भीतीचे वातावरण निर्माण झाली आहे. नगरपालिकेच्या वतीने या कुत्र्यांना पकडून त्यांची नसबंदी व लसीकरण करण्यात येणार असल्याचे सांगण्यात आले. ही मोहीम सुरू राहणार असल्याचे नगरपालिका कर्मचाऱ्यांनी सांगितले.



# नासिक मध्ये ठाकरे गट व मनसेचा संयुक्त जन आक्रोश मोर्चा

**दैनिकः युवक आधार**
**कृष्णा गायकवाड- पिंपळगाव बसवंत**

मनसेचे दिंडोरी तालुका अध्यक्ष नामदेव गावित यांच्या नेतृत्वाखाली दिंडोरी सह निफाड तालुक्यातुन नाशिक कडे एकच गर्दी

नासिक ब्लॅक आऊट संयुक्त जन आक्रोश मोर्चा बी डी कॉलेज ते जिल्हाधिकारी कार्याल

या मोर्चा राजकारण जनतेचा सत्ताधाऱ्यांवर मोठा राग आहे आणि त्याचाच परिणाम म्हणून या ठिकाणी जर आपण पाहिलं तर उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची सेना सोबतच महाराष्ट्र नवनिर्माण सेना मित्र मंडळी आहेत ते आता त्या मोर्चामध्ये या ठिकाणी दाखल होऊ लागलेले आहेत आणि संपूर्ण नाशिक शहर आता या मोर्चामध्ये एकवटलेला आहे अशा परिस्थिती या ठिकाणी आपल्याला बघायला मिळत आहे सर्वात महत्त्वाचं म्हणजे जे आंदोलन करते आहेत मोर्चेकरी आहेत त्यांनी या ठिकाणी काळे कपडे घातलेले आहे हातात





काळे झेंडे घेतलेले आहे आणि हा सर्व ताफा घेऊन हे संपूर्ण जनसमुदाय जिल्हाधिकारी कार्यालयाकडे चालू लागलेले आहेत आंदोलन, मोर्चा काढावा लागतो आहे हेच नाशिक जिल्ह्याचे दुर्दैव आहे महाराष्ट्र नवनिर्माण सेना असेल उद्धव बाळासाहेब ठाकरे यांची सेना असेल यांचा हा जनसमुदाय मोर्चा आपल्याला या ठिकाणी खरं तर पाहायला मिळतो आहे मोठ्या प्रमाणात नाशिक करांमध्ये मोठ्या प्रमाणात उत्साह बघायला मिळत आहे. कुंभमेळा भ्रष्टाचार, बेरोजगारी, हनी ट्रॅप प्रकरण महिला सुरक्षा, असो सावकारी वसुली, ऑनलाइन फसवणूक, शेतकरी संकट, एम डी ड्रग्स प्रकरण अवैध धंदे. प्रशासनातील सर्वव्यापी भ्रष्टाचार या सर्व विषयासंदर्भात जीवत देखावे तयार करून मोठ्या प्रमाणात प्रचार करण्यात आला या प्रसंगी सत्ताधारी पक्षाविरोधात जोरदार टीका करण्यात आली.

प्राप्त जे प्रकरण या ठिकाणी समोर आले होतो त्यानंतर संपूर्ण त्यासाठी आता महाराष्ट्र नवनिर्माण सेना आणि उद्धव बाळासाहेब ठाकरे सेना यांची सेना ही आता एकत्र झालेली आहे आणि आपण मोठे मोठे नेते देखील नाशिकमध्ये दाखल झालेले आहेत श्री संजय राऊत साहेब देखील दाखल झाले.

तर बाळा नांदगावकर असतील संदीप देशपांडे यांच्या सोबतचे जे अनेक मनसेचे वरिष्ठ पदाधिकारी आहेत ते देखील या ठिकाणी दाखल झालेले होते नाशिकच्या मेन रोड परिसरातून हा संपूर्ण मोर्चा जिल्हाधिकारी कार्यालयावर या ठिकाणी मोर्चा आला.

शिवसैनिक आपल्या सोबत आहेत मोर्चा काढायची वेळ येत नाही सत्ताधारी पक्षाने आणली आहे काळे कपडे घातलेले गळ्यात लिखित पाटी अडकवलेले देखावे येथे भविष्यात मोर्चा काढायची वेळ आणली आहे महाराष्ट्र फक्त भ्रष्टाचार कसा हे सत्ताधारी पक्षाकडून शिकले पा हिजे ५० किलोमीटर वरतून एक स्वयंघोषित पालक मंत्री पाठवला जातोय खरंतर नाशिकची परिस्थिती अत्यंत दुर्दैवीय वाईट आहे.

येतो आधी है तुफान तो अभी बाकी है.

मनसेचे दिंडोरी तालुका अध्यक्ष श्री नामदेव गावित यांच्या नेतृत्वाखाली दिंडोरी सह निफाड व इतर तालुक्यातून मोठ्या प्रमाणात कार्यकर्त्यांनी एकच गर्दी केली होती या सर्व कार्यकर्त्यांचे नामदेव गावित यांनी मनापासून आभार व्यक्त केले.

## निफाड बसस्थानकातील खड्डे बुजविणे आणि दोन्ही गेट वाहतुकीसाठी खुली करण्याची मागणी





**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

**निफाड :** शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेल्या निफाड एस.टी. बसस्थानक परिसरात मोठमोठे खड्डे पडल्यामुळे प्रवासी व नागरिक त्रस्त झाले आहेत. खड्ड्यांमुळे बसस्थानकात येण्या-जाण्यास अडचणी निर्माण होत असून प्रवाशांना चिखल, धूळ व अपघाताचा धोका निर्माण झाला आहे. प्रवासी संघटनांनी आणि नागरिकांनी अनेकदा तक्रारी करूनही अद्याप प्रशासनाकडून ठोस उपाययोजना झालेली नाही. बसस्थानकातील मुख्य प्रवेशद्वारच नव्हे तर मागील गेट बंद ठेवल्यामुळे सर्व वाहतूक एका गेटमधूनच सुरू आहे. त्यामुळे बसची गर्दी, वाहनांचा ठप्प होणारा तासाभराचा अडथळा आणि प्रवाशांना उशीर असा त्रास होत आहे.शुक्रवारी बाजार असल्याने मोठया प्रमाणात वाहतूक कोंडी होते.

स्थानिक नागरिकांचे म्हणणे आहे की, जर बसस्थानकातील दोन्ही गेट वाहतुकीसाठी खुली केली तर वाहतूक सुरळीत होईल. तसेच खड्डे तत्काळ बुजवून डांबरीकरण झाले तर प्रवाशांना दिलासा मिळेल. याबाबत नागरिकांनी तातडीने कार्यवाही करण्याची मागणी एस.टी. महामंडळ प्रशासनाकडे केली आहे. प्रशासनाने याकडे लक्ष देऊन बसस्थानकातील खड्डे बुजविणे व दोन्ही गेट वाहतुकीसाठी खुली करणे ही तातडीची गरज असल्याचे नागरिकांनी स्पष्ट केले आहे.यावेळी विजय धारराव, दीपक श्रीवास्तव, हरीश कापडी, विजय झोटिंग, अतुल रंधवे, नवनाथ धार राव, अशोक शेळके, अनिल धार राव, किरण धरराव, केशव गायकवाड, विजयकुमार बनवट, समाधान कुंभार्डे, माणिक धार राव, प्रतीक गोसावी नागरिक उपस्थित होते.

## आरोग्य उपकेंद्र कोयाळी ( बु )येथील डॉ.निलेश ढोणे यांची बदली करा:- कोयाळी ग्रामस्थांची मागणी

### ( जिल्हा आरोग्य अधिकारी यांना ग्रामस्थ कोयाळी (बु)यांचे निवेदन )

**दैनिक युवक आधार**
**वाशीम जिल्हा प्रतिनिधी करण धोंगडे**




रिसोड (वाशिम) आज समस्त ग्रामस्थ मंडळी यांच्या वतीने जिल्हा आरोग्य अधिकारी जि.प.वाशिम यांना तक्रार निवेदन दिले आहे की मागील वर्षापासून डॉ.निलेश ढोणे कार्यरत आहेत,मात्र डॉ.वेळेवर कधीच उपकेंद्रात येत नाहीत,घरी जाताना देखिल लवकर जातात ग्रामस्थ मंडळी चे कॉल न उचलने,त्याच सोबत ग्रामस्थ उपकेंद्रात जाताच व्यवस्थित वागणूक न मिळणे,उपकेंद्रामध्ये सगळीकडे घाणीचे साम्राज्य पसरले आहे, गावामध्ये डेंग्यूचे पेशंट मागील महिन्यात रुग्णांची संख्या पाच एवढी वाढली होती,मात्र यावर उपाययोजना उपकेंद्राने केलेल्या नाहीत,उपकेंद्रामध्ये धूर फवारणी सुद्धा अद्याप झालेली नाही, कोयाळी येथे पर्मनंट नर्स नसल्यामुळे तसेच डॉक्टर रेगुलर सेवेत नसताना गावामध्ये वृद्ध,गरोदर स्त्रियांना वेळेत उपचारात्मक सेवा सुविधा मिळत नसल्यामुळे,ग्रामपंचायत ठरवासह कोयाळी येथील नागरिक सामाजिक कार्यकर्ते गोपाल भिसडे,संजय भिसडे, प्रशांत खरबळकर यांनी डॉ.याच्या बदलीचा ठराव देत तक्रार अर्ज केला आहे तरी येत्या आठ दिवसात बदली न झाल्यास किंवा यावर तोडगा न काढल्यास आपल्या कार्यालयासमोर समस्त ग्रामस्थ मंडळी यांच्यासह उपोषणास बसू असा ही इशारा निवेदनात दिला आहे.

# आ. श्री बाबाजी काळे मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात ग्रामपंचयातीने सहभाग घ्यावा --आ. बाबाजी काळेंकडून प्रोत्साहनपर बंपर बक्षिसांची घोषणा

## खेड समृद्ध खेडी बनविणे हे आपले कर्तव्य

**दैनिक युवक आधार**
**पुणे जिल्हा प्रतिनिधि संतोष लांडे**

**भारत देशाच्या** विकास होण्यासाठी समृद्ध खेडी बनविणे हे आपले कर्तव्य आहे त्या दृष्टीने विकासासाठी सरपंच उपसरपंच सदस्य आणि ग्रामस्थ यांनी प्रयत्न केले पाहिजेत असे प्रतिपादन करत मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियानात ग्रामपंचयातीने सहभाग घ्यावा असे आव्हान खेड-आळंदी चे आमदार बाबाजी काळे यांनी राजगुरूनगर येथे केले. यावेळी त्यांनी प्रोत्साहनपर बंपर बक्षिसांची घोषणा केली




मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान तालुकास्तरीय कार्यशाळेचे खेड पंचायत समितीच्या वतीने राजगुरूनगर येथे आयोजन करण्यात आले होते. यावेळी मार्गदर्शन करताना आमदार बाबाजी काळे बोलत होते. यावेळी प्रमुख मार्गदर्शक यशदाचे कुंडलिक कोहिनकर, सरपंच परिषदेचे तालुका अध्यक्ष मनोहर पोखरकर, बाजार समितीचे संचालक जयसिंग भोगाडे, माजी सरपंच केशव अरगडे, खेडचे गटविकास अधिकारी विशाल शिंदे, सहाय्यक गटविकास अधिकारी सुनील भोईर, बांधकाम उपअभियंता जयंत कचरे, पाणी पुरवठा उपअभियंता कालिका खरात,कृषी अधिकारी सोनाली पवार, विस्तार अधिकारी सुकदेव साळुंखे, सुभाष भोकटे, रुपाली तांदळे, बबन मोरे, स्वाती भोईरकर, नामदेव बांगर, बी एस लोंढे यांच्यासह मोठ्या संख्येने सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामसेवक, उपस्थित होते

गटविकास अधिकारी विशाल शिंदे म्हणाले,सरपंच ग्रामस्थ यांनी आपल्या गावात रेन वॉटर हार्वेस्टिंग साठी प्रयत्न करावेत. सांडपाणी, बंदिस्त गटार प्रश्न सोडवावा. महात्मा गांधी रोजगार हमी योजनेचे प्रस्ताव तयार करून पाठवावे. ३१ डिसेंबर पर्यंतचे सर्व प्रस्ताव मंजूर करू. तालुक्यातील सर्व शासकीय कार्यालयात रेन वॉटर हार्वेस्टिंग करणार आहोत. स्वच्छ भारत मिशन प्रभावीपणे गावात राबवावे. टप्पा २ प्रधानमंत्री आवास योजनेत तालुक्यात ३५०० घरकुल आहेत. अपूर्ण घरकुले पूर्ण करण्याच्या प्रयत्न करावेत. वृक्ष लागवडीला प्राधान्य द्यावे. त्यासाठी काही संस्थाची मदत घ्यावी. ग्रामपंचायतीने नाविन्य पर्वक उपक्रम राबवावेत. मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियानचा जीआर वाचून त्याप्रमाणे सरपंचांनी काम करावे.

आमदार बाबाजी काळे म्हणाले, मुख्यमंत्री समृद्ध पंचायत राज अभियान मध्ये खेड तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींनी सहभाग घ्यावा. शासनाकडूनन बक्षिसे तर मिळणार आहेत परंतु आपल्या ग्रामपंचायतीचा गावांचाही विकास होणार आहे. दि. १७ सप्टेंबर ते ३१ डिसेंबर या काळात हे अभियान राबविले जात आहे. सुमारे २९० कोटी रुपये ग्राम विकास विभागाच्या माध्यमातून तरतूद झाली आहे राज्यात तालुकास्तरावर १५७ कोटी जिल्हा स्तरावर ३४ कोटी,विभाग स्तरावर २८.५० कोटी आणि राज्य स्तरावर २४.७५ कोटी कोटी आणि प्रचार प्रसार आणि इतर सर्व कार्यक्रमांसाठी ४५ कोटी असे २९०.३० कोटी अशी शासनाने तरतूद केली आहे.

चौकट ....

मी तालुक्याचा प्रतिनिधी, विकास कामांना गती देण्यात कमी पडणार नाही...

मुख्यमंत्री समृद्ध पंचायतराज अभियान सर्वांनी पुढे न्यायचे आहे. तालुक्यातील १६२ ग्रामपंचायतीच्या सरपंच उपसरपंच सदस्य ग्रामसेवक आणि गावातील कर्तव्यदक्ष आजी माजी पदाधिकारी यांनी या अभियानाचे उद्दिष्टच सफल करावे. या अभियानामध्ये सर्वांनी सहभागी व्हा, तुम्हाला ज्या ज्या स्तरावर मदत लागेल तेथे सर्व मदत शासनाच्या माध्यमातून, जिल्हा परिषद च्या माध्यमातून, पंचायत समितीच्या माध्यमातून मिळेल. आमदार म्हणून मला जिथे कर्तव्य पार पडायला लागतील ती सर्व पार पाडली जातील. गाव पातळीवर वैयक्तिक पातळीवरचे सर्व प्रश मार्गी लावले जातील असेही आमदार काळे म्हणाले.

आमदार बाबाजी काळे यांच्या कडून बक्षिसांची घोषणा.

व्यासपीठावर असताना संकल्पना सुचली की, या अभियानातून ग्रामपंचायतीला गावाला शासनाकडून बक्षिसे दिली जातात. परंतु खरे काम करणारे सरपंच, उपसरपंच आणि ग्रामस्थांसह ग्रामसेवक, ग्रामपंचायत कर्मचारी असतात. त्यांचा गौरव होणे गरजेचे आहे त्यामुळे या अभियानात शासनाचे बक्षीस मिळणाऱ्या ग्रामपंचायतीच्या सरपंच, ग्रामसेवक आणि कर्मचारी यांना आमदार निधीसह व आमदार बाबाजी काळे मित्र मंडळ, खेड पंचायत समिती यांच्याकडून बक्षिसे दिली जातील;असे आमदार बाबाजी काळे यांनी आपल्या भाषणात जाहीर केले

अशी असणार बक्षिसे –

तालुक्यामध्ये पहिल्या तीन ग्रामपंचायतीच्या सरपंच, ग्रामसेवकाला अनुक्रमे १ स्कुटी- मोटारसायकल, एलईडी टीव्ही, फ्रिज. ग्रामपंचायत मधील शिपाई , क्लार्क,कम्प्युटर ऑपरेटर यांनाही बक्षिसे दिली जाणार आहेत. ग्रामपंचायतीच्या कर्मचाऱ्यांना पहिल्या तीन क्रमांकासाठी अनुक्रमे ३१ हजार रुपये,२१ हजार, १५ हजार रुपये देण्यात येणार आहेत. हि बक्षिसे प्रोत्साहन देणारी आहेत. तालुक्याच्या वतीने ते गरजेचे आहे .ज्या दिवशीही शासन बक्षीस जाहीर करील त्या दिवशी आपण हा कार्यक्रम पंचायत समितीघेणार असून त्यात हे वितरण केले जाणार आहे. बक्षिसांचा उद्देश आपण एक चांगलं काम कराव असा आहे. आमदार निधीतून पहिल्या नंबरमध्ये येणाऱ्या ग्रामपंचायतीला जास्तीचा अनुक्रमे दहा, सात, पाच लाखाचा निधी दिला जाणार आहे. अशी घोषणा आमदार काळे यांनी केली . या कार्यशाळेत यशदाचे व्याख्याते कुंडलिक कोहिनकर यांनी मार्गदर्शन केले सूत्रसंचालन दमा पिंगळे यांनी केले. आभार विस्तार अधिकारी सुकदेव साळुंके यांनी मानले.

## वरणी स्थानिक गुन्हे शाखा पथकांची कारवाई

**दैनिक युवक आधार**

**वणी:प्रतिनिधी** – वरणी शहरात दिवसेंदिवस अमली पदार्थ विक्री होत असल्याचे दिसून येते आहे. १० सप्टेबरच्या रात्री ११ वाजता स्थानिक गुन्हे शाखेने टिळक चौक येथे एमडी ड्रग विक्री करीत असताना दोन इसमाकडून ३-३७ ग्राम ड्रंग पावडर जप्त करण्यात आली. स्थानिक गुन्हे शाखा पथकाला गोपनीय माहिती मिळाली की, टिळक चौक येथे अमली पदार्थांची डील होणार आहे. अशा माहितीवरून स्थानिक गुन्हे शाखेने त्या परिसरात पाळत ठेवून संधीचा फायदा घेत ११ वाजताचे दरम्यान एका आइस्क्रीम दुकान व पान ठेवल्याचे मागे एमड़ी पदार्थ विक्री सुरू असताना झंड़प घालून दोघना ताब्यात घेतले, त्यांची अंग झुडती घेतली असता एका पालेथीनच्या पन्नीमध्धे ३-३७ ग्राम एमडी पावडर आढळला पोलीस पथकाने सदर प्रकरणी आरोपी युगांत दिनेश दुर्गे 19 वर्ष राहणार शिवा्जी चौक, विसापूर. जिल्हा. चंद्रपूर हल्ली मुक्काम पंचशील नगर वर्णी व शहबाज सत्तार मिझा 4 वर्ष राहणार साईनगरी वर्णी असे दोघांना अटक करून त्यांचे विरुद्ध 8( क )21 (ए) 29 एन डी पी एसअॅक्ट अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपीकडून एक बुलेट मोटरसायकल व दोन स्मार्टफोन असा तीन लाख 24 हजाराचा मुद्मोल जप्त करण्यात आला. सदरची कारवारई जिल्हा पोलीस अधीक्षक कुमार चिंता,अप्पर पोलीस अधीक्षक अशोक थोरात, पोलीस निरीक्षक सतीश चवरे, स्थानिक गुन्हे शाखा यवतमाळ, यांचे मार्गदर्शनाखाली एपीआय दत्ता पेंडकर, सुनील खंडागळे, सुधीर पांडे, रजनीकांत मडावी, सलमान शेख, चालक सतीश फुके, स्थानिक गुन्हे शाखा यांनी पार पाडली.



## अनोळखी इसमाचा मृतदेह सापडला

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : उरण पोलिसांना अंदाजे 25 ते 30 वर्षीय अनोळखी इसमाचा मृतदेह सापडला असून पोलीस त्याच्या नातेवाईकांचा शोध घेत आहेत. त्याचा चेहरा उभट असून डोक्याचे केस काळे असून तो गहूर्णीय आहे. त्याने अंगात निळ्या रंगाचे हाफ बनियान त्यावर रिबुक असे इंग्रजीत लिहिलेले आणि काळया रंगाची हाफ पॅन्ट परिधान केले आहे. या मृत इसमा बाबत अधिक माहिती असल्यास उरण पोलिसांशी संपर्क साधावा.

## जखमी अवस्थेतील इसमाचा मृत्यू

**दैनिक युवक आधार**

**नवीन पनवेल वार्ताहर** : जखमी अवस्थेत सापडलेल्या इसमाचा मृत्यू झाला असून या इसमाच्या नातेवाईकांचा शोध उरण पोलीस घेत आहेत. अंदाजे 35 वर्षीय इसम शिवस्मारक दास्तान फाटा जासई येथे जखमी अवस्थेत आढळून आला. त्याला एमजीएम हॉस्पिटल कामोठे येथे उपचारासाठी दाखल केले त्यावेळी डॉक्टरांनी त्याला मृत घोषित केले. हा इसम अंगाने सडपातळ असून उंची पाच फूट तीन इंच आहे. आणि रंग सावळा आहे. त्याने अंगात निळ्या रंगाची जीन्स आणि निळ्या रंगाचा फुल शर्ट त्यावर त्यावर पांढऱ्या रंगाचे पट्टे आहेत. कमरेला हिरव्या रंगाचा कापडी पट्टा आणि निळ्या रंगाची लक्स व्हीनस असे इंग्रजीत लिहिलेली निळ्या रंगाची अंडरवेअर परिधान केले आहे.

## जोगेश्वरी (पूर्व) परिसरात सलग चोरीच्या घटना – नागरिकांत भीतीचे वातावरण

**दैनिक युवक आधार**

किशोर गुडेकर, मुंबई विभाग प्रतिनिधी प्रमुख

मुंबई जोगेश्वरी (पूर्व) परिसरात गेल्या काही दिवसांपासून चोरीच्या घटनांनी नागरिक व व्यापारी वर्गात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. स्मशान टेकडी परिसरातील कमला शंकर शुक्ला चाळ, वाघमारे चाळ, प्रताप नगर या भागात एका रात्रीत अनेक ठिकाणी चोरीच्या घटना घडल्या.

श्री. दिनेश पवार यांच्या घरातून सोन्याचे दागिने चोरीस गेले, तर इतर चार घरांमध्ये घरफोडी झाली. मात्र त्या घरांतून काही साहित्य गेले नाही. याशिवाय, स्मशान टेकडी येथील DD Wholesale Mart (मयूर भाई) या दुकानावरचे पत्रे काढून चोरी करण्यात आली. या घटनांमुळे परिसरातील रहिवासी व व्यापारी वर्गामध्ये प्रचंड असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. “पत्रे काढण्याइतकी चोरट्यांची हिम्मत झाली असल्याने आमच्या जीवितास व संपत्तीला गंभीर धोका आहे,” अशी प्रतिक्रिया स्थानिक नागरिकांनी दिली.

या संदर्भात रहिवासी व व्यापाऱ्यांनी जोगेश्वरी (पूर्व) पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली असून पोलिसांनी गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे. परिसरात तातडीने गस्त वाढवावी, चोरट्यांचा शोध घेऊन कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली आहे. यासंदर्भात मुंबई प्रदेश राष्ट्रवादी युवक काँग्रेसचे सचिव अजित म्हामुणकर यांनी देखील पोलिसांकडे लेखी तक्रार सादर करून या घटनांचा गंभीरपणे तपास करण्याची मागणी केली आहे.

# शिक्षकाची बदली होताच चिमुकल्याची अश्रू अनावर

**दैनिक युवक आधार**
**अनिल ससाने टेंभुर्णी प्रतिनिधी**


अनिल ससाणे जाफराबाद तालुक्यातील गाव बोरखेडी चिंच जिल्हा जालना येथील जिल्हा परिषद शाळेचे शिक्षक मधुकर निवृत्ती गोफणे यांची बदली आळंद तालुका जाफराबाद येथील शाळेत झाली असता गोफणे सर शाळेतून जात असताना शाळेतील विद्यार्थी शाळेच्या कानाकोपऱ्यात बसून रडत होती व काही विद्यार्थी सर तुम्ही जाऊ नका ना रडत रडत म्हणत होती काही विद्यार्थी चक्क सरांच्या गळ्यात पडून रडत होती विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे नाते काय असते हा तर खरा प्रामाणिक शिक्षकच जाणू शकतो शाळेतील तो क्षण अतिशय भाविक होता बघणाऱ्यांच्या डोळ्यातून अक्षरश पाणी गळत होते

**त्यातील सत्य मात्र लपत नाही**

..तरीही शाळेत गेल्यानंतर जे व्हायचे तेच झाले... मुलांनी रडून रडून डोळे लाल करून घेतले होते मी *जाण्याआधीच..खरंय मनातल्या भावनांना कुठे बांध घालता येतो ? माझेही तसेच झाले.. आजचा दिवस म्हणजे हृदय पिळवटून टाकणारा होता... शब्दातीत...शिक्षक विद्यार्थी यांचे नाते म्हणजे प्रेम, माया,आपुलकी आदर यांनी गुंफलेली घट्ट वीण...जी सुटता सुटत नाही..एका शिक्षकांसाठी विद्यार्थ्याच्या मनात आपल्या विषयी असणारा आदर आणि जिव्हाळा हेच खरे पारितोषिक.. केवळ विदयार्थीच नाही तर सहशिक्षिका अंगणवाडी ताई शिकाऊ शिक्षक आशाताई*
*शेवटी हेच सत्य " दूर जाणारी नातीच जास्त हवीहवीशी वाटतात .. आज शब्दच सूचत नाही... बोरखेड़ी चिंच शाळेतुन... आळंद शाळेत बदली ... ११ वर्ष २६ दिवस ज्या शाळेत कार्य केले आज निरोप घेत असताना खुप त्रास झाला.... बोरखेड़ी चिंच गावातील प्रत्येक व्यक्ति महिला भगिनी मित्र सहकारी व विद्यार्थी....यांचा निरोप घेताना आज शब्दच सूचत नाही.... काय लिहाव माझ्या बोरखेडीच्या माझ्या मानसाबद्दल व विद्यार्थिबद्दल... तुम्ही माझ्यासाठी खुप अनमोल आहत मला भरभरून प्रेम दिल.... मी सदैव तुमच्या ऋणात राहिल...

**(मधुकर गोफणे सर यांचे मनोगत)**

संध्याकाळी अचानक बदलीच्या ऑर्डर आल्या आणि मनात विचाराचे काहूर उठले. बदली होणार हे तर माहित होतेच.पण प्रत्यक्ष जेव्हा ऑर्डर चे कळले तेव्हा लगेच 'सर तुम्ही जाऊ नका ना"म्हणणारे मुलांचे निरागस चेहरे डोळ्यासमोर उभे राहिले..शाळेत जाताच सर आले म्हणून टिफिन बैग घेण्यासाठी एकमेकांशी हुज्जत घालत सर भोवती गराडा घालणारे. कोणी गुलाबचे फुल देऊन, कोणी माझ्यासाठी स्पेशल आणलेला खाऊ देऊन स्वागत करणारे,आपल्या अनेक गप्पांची जणू मालिकाच सुरु करणारे..गोड गोंडस चेहरे, त्यांचे निःस्वार्थ निस्सीम प्रेम, माया, आदर आपुलकी यांचे चलचित्र च डोळ्यापुढे नाचू लागले.उद्या त्यांना कसा निरोप द्यायचा यां विचाराने दाटून आले..
" **डोळ्यातले अश्रू लपविता येतात**







## वैनतेय विद्यालयात हिंदी दिनानिमित्त वक्तृत्व व प्रश्नमंजुषा स्पर्धा उत्साहात

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

निफाड येथील वैनतेय विद्यालयात हिंदी दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमांतर्गत वक्तृत्व स्पर्धा व प्रश्नमंजुषा स्पर्धा मोठ्या उत्साहात पार पडल्या. कार्यक्रमाच्या प्रारंभी विद्यालयाचे पर्यवेक्षक बी. बी. गुंजाळ, परवेज शेख व वैभव कर्डिले यांनी उपस्थितांना हिंदी दिनाचे महत्त्व समजावून सांगितले. विद्यार्थ्यांना मातृभाषेबरोबर राष्ट्रभाषेचे महत्त्व पटवून देत त्यांनी हिंदीच्या प्रसार-प्रचारासाठी प्रयत्नशील राहण्याचे आवाहन केले.

वक्तृत्व स्पर्धेतील यशस्वी स्पर्धक
प्रथम: श्रावणी खालकर
द्वितीय: समीक्षा धुमाळ
तृतीय: स्पर्श दौंड
उत्तेजनार्थ: आराध्या कुंदे
प्रश्नमंजुषा स्पर्धेतील यशस्वी स्पर्धक
ओमकार कोल्हे, संस्कार सांगळे, स्नेहा नागरे, ईश्वरी शिंदे व मृण्मयी सुरवाडे यांनी यश संपादन केले.

या सर्व विजेत्या विद्यार्थ्यांचा न्या. रानडे विद्या प्रसारक मंडळाचे सचिव रतन पाटील वडघुले यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. या वेळी संस्थेचे विश्वस्त मधुकर राऊत, पर्यवेक्षक गुलाब टकले, बी. बी. गुंजाळ, हिंदी विभाग प्रमुख परवेज शेख, सुभाष खाटेकर, टी. के. तलवारे, साहेबराव बर्डे, रशीद पठाण, सौ. भारती लंबाते, सौ. एस. एस. कापसे, सौ. संगीता चौधरी आदी मान्यवर उपस्थित होते.

वक्तृत्व स्पर्धेचे परीक्षण रशीद पठाण यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सौ. संगीता चौधरी व कु. शिवानी बनकर यांनी केले. तर या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी हिंदी विभाग प्रमुख परवेज शेख व सौ. संगीता चौधरी यांनी विशेष परिश्रम घेतले.



## वाळूच्या बातम्या का लावतो म्हणत जातीवाचक शिवीगाळ करत बौद्ध पत्रकारास मारहाण..

**दैनिक युवक आधार**
**परतूर-जालना(अशोक ठोके)**

तुझा पत्रकार पती माझ्या वाळूच्या ट्रॅक्टरच्या बातम्या लावतो असे म्हणत आनंदवाडी गावातील वाळूमाफियांनी बौद्ध पत्रकार व त्याच्या कुटुंबीयांवर हल्ला करून जातीवाचक शिवीगाळ केल्याप्रकरणी वाळूमाफियाविरुद्ध परतूर पोलिस ठाण्यात अनुसूचित जाती प्रतिबंध कायद्या अंतर्गत (Atrocity Act) तिघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

आनंदवाडी येथील पत्रकार पांडुरंग तुळशीराम शेजूळ यांनी परतूर पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे.प्रशांत भगवान कदम रा.आनंदवाडी, आणि पवार पूर्ण नाव माहीत नाही रा. वरफळवाडी, आणखी एक असे तिघे जण तेथे उभे होते. यावेळी कदम यानेपांडुरंग शेजूळ यांना उद्देशून जातीवाचक शिवीगाळ केली. घडलेला प्रकार शेजूळ यांनी पत्नीला सांगितला. पत्नीने कदम यास जाब विचारताच प्रशांत व पवार या दोघांनी तुझा पती माझ्या वाळूच्या ट्रॅक्टरच्या बातम्या लावत आहेअसे म्हणत जातीवाचक शिवीगाळ करून मारून टाकतो असे म्हणत जिवे मारण्याची धमकी दिली. दोघांनी शेजूळ यांना व त्याच्या पत्नीला लाथाबुक्क्यांनी मारहाण करून मुक्का मार दिला व प्रशांत याने पांडुरंग शेजुळ यांचा डावा हात पिरगाळला असल्याचे दिलेल्या फिर्यादीत म्हटले आहे. या प्रकरणी प्रशांत कदम, पवार, आणि इतर एक असे तिघांविरुद्ध परतूर पोलिस ठाण्यात ८ सप्टेंबर रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून उपविभागीय पोलीस अधिकारी रामेश्वर रेंगे हे करत आहेत.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॉक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# फुले शाहू चॅरिटेबल व वेल्फेअर असोसिएशन च्या भंडारा जिल्हाध्यक्षपदी आशिष चेडगे


## मुंबईहून आले पत्र ; राज्य अध्यक्ष संजीव भांबोरे यांचे सहकार्य

**दैनिक युवक आधार**
**साकोली प्रतिनिधी**

फुले ,शाहू चॅरिटेबल व वेल्फेअर असोशियन ( एनजीओ) या संस्थेच्या ठाणे (मुंबई )महाराष्ट्र, या सामाजिक व राज्यस्तरीय शासकीय नोंदणीकृत ट्रस्टच्या भंडारा जिल्हा अध्यक्षपदी पत्रकार आशिष चेडगे यांची आज शनिवार १३ सप्टेंबरला फाऊंडेशनचे राष्ट्रीय अध्यक्ष विजय हिंगोले मुंबई यांनी ही निवड केली आहे. महा. शासन मान्य प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघ जिल्हा अध्यक्ष तथा सोशल मिडीयातून गोरगरीबांच्या मुलीस आर्थिक मदत मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणारे आशिष चेडगे यांचे नाव राज्य सरचिटणीस संजीव भांबोरे यांनी सुचविले होते. तसे मुख्यालय भिवंडी मुंबई येथून आज आशिष चेडगे यांना पत्र येत या अग्रेसर ट्रस्टच्या "भंडारा जिल्हा अध्यक्ष" पदावर नियुक्ती करण्यात आले. याबाबद साकोलीसह भंडारा जिल्ह्यातील पत्रकार व सामाजिक क्षेत्रात आशिष चेडगे यांना शुभेच्छा दिल्या जात आहेत.

फुले शाहू चॅरिटेबल व वेल्फेअर फाऊंडेशन ही शासनमान्य व महाराष्ट्रातील अग्रगण्य संस्था आहे. यामध्ये या फाऊंडेशन कडून आरोग्य सुविधा, औषधी पुरवठा, अपंगत्व असलेल्या व्यक्तींना कृत्रिम हात पाय, खेळोत्तेजक प्रशिक्षणासाठी ५०% भांडवल, युवा बेरोजगारांना विविध रोजगार उपलब्ध, विधवा, तृतीयपंथींना ५०% भांडवल देत व्यवसाय संधी, गोरगरीब शेतकऱ्यांना कृषी साहित्य अवजारे, औषधी यात १०% भांडवल, चालकांना वाहन खरेदीसाठी ५०% भांडवल व २ लाखांचा अपघात विमा, शासन अनुदानित खेळ, प्रशिक्षण, स्पर्धा करीता ५०% भांडवल, कर्जबाजारी गरीब व्यक्तींना ५०% रक्कम फाऊंडेशनतर्फे देत त्यांना पुन्हा व्यवसायात खंबीर करणे अश्या विविध सेवाकार्य ही राज्यस्तरीय फुले शाहू चॅरिटेबल व वेल्फेअर फाऊंडेशन संस्था करीत आहे. आज महाराष्ट्र शासन मान्य प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघ महाराष्ट्र राज्य सरचिटणीस संजीव भांबोरे यांनी साकोली येथील श्रमिक पत्रकार तथा पत्रकार सेवा संघ जिल्हा अध्यक्ष आशिष चेडगे यांचे नाव मुंबईला सुचविले. त्यातच त्यांची नियुक्ती मुख्य कार्यकारिणी मध्ये "भंडारा जिल्हा अध्यक्ष" या पदावर नियुक्ती करण्यात आली आहे. तसे पत्र आज साकोलीत त्यांना प्राप्त झाले. नवनियुक्त अध्यक्ष आशिष चेडगे यांनी सांगितले की, आता कोणत्याही गोरगरीब जनता, विधवा महिला, युवा सुशिक्षित बेरोजगार, दिव्यांग व्यक्ती, गरीब शेतकरी व सामान्य व्यापारींना यापुढे त्रास होणार नाही. आणि सदर फाऊंडेशन सातत्याने भंडारा जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यात आपले सदस्यगण नोंदणी पूर्ण करीत यांचा प्रत्येक सामान्य जनतेला लाभ दिला जाईल असे सांगितले.

साकोली क्षेत्रातील सोशल नेटवर्किंग मिडीयावर नंबर १ असलेले आशिष चेडगे यांची महाराष्ट्र राज्यस्तरीय "फुले शाहू चॅरिटेबल व वेल्फेअर फाऊंडेशन" च्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघाचे सर्व पदाधिकारी व सभासद, तालुका पत्रकार संघाचे सर्व पदाधिकारी, साकोली सेंदूरवाफा स्थानिक निवासी संघटनाचे पदाधिकारी व सदस्यगण, व्हीआयपी ग्रुप, साकोली मिडिया व फ्रिडम युथ फाऊंडेशन कडून आशिष चेडगे यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.




---

# निफाडमध्ये 'सेवा पंधरवडा' उपक्रमाची उत्साहात सुरुवात

## रस्त्यांपासून घरांपर्यंत नागरिकांच्या हक्कासाठी उपक्रमांची मालिका

**दैनिक युवक आधार**
**नाशिक जिल्हा प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जयंतीनिमित्त (१७ सप्टेंबर) ते राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीपर्यंत (२ ऑक्टोबर) निफाड तालुक्यात 'सेवा पंधरवडा' मोठ्या उत्साहात साजरा होणार आहे. छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम, गतिमान आणि पारदर्शक करण्यासाठी ही विशेष उपक्रममालिका राबवली जात आहे. याबाबतची माहिती प्रांतधिकारी डॉ. शशिकांत मंगरुळे व तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनी दिली.

उपक्रमांचे टप्पे

पहिला टप्पा : पाणंद रस्ते अभियान (१७ ते २२ सप्टेंबर)
पाणंद व शिवार रस्त्यांना क्रमांक देणे
गाव नकाशावर रस्ते चिन्हांकित करणे
नोंद नसलेल्या रस्त्यांचा समावेश
शेतरस्त्यांसाठी संमतीपत्रे घेणे
रस्ता अदालत घेऊन प्रलंबित प्रकरणे निकाली काढणे
शेतरस्त्यांची मोजणी व सीमांकन

दुसरा टप्पा : सर्वांसाठी घरे (२३ ते २७ सप्टेंबर)
शासकीय जमीन कब्जेहक्काने उपलब्ध करून देणे
गायरान जमिनीवरील अतिक्रमणे नियमनबद्ध करणे
विकास आराखड्याशी विसंगत आरक्षण बदल प्रस्ताव सादर करणे
लाभार्थ्यांना पट्टे वाटप
खासगी मिळकतींसाठी पट्टे वितरण

तिसरा टप्पा : नावीन्यपूर्ण उपक्रम (२८ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर)
गाव तिथे स्मशानभूमी
महसूल अदालत
कार्यालयीन स्वच्छता
आयुष्मान कार्ड वितरण

नागरिकांचा सहभाग अपेक्षित

प्रांतधिकारी डॉ. शशिकांत मंगरुळे म्हणाले की, "हा सेवा पंधरवडा केवळ दोन आठवड्यांचा कार्यक्रम नसून महसूल प्रशासनाच्या कामकाजात सातत्याने पारदर्शकता व गतिमानता आणण्याचे माध्यम आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन शासनाच्या योजनांचा लाभ घ्यावा."

तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनीही आवाहन केले की, "प्रत्येक टप्प्यातील उपक्रमांचा थेट फायदा सामान्य जनतेला होणार असून गावागावातून सक्रिय सहभाग आवश्यक आहे."

---

# इतर समाजाची आदिवासी मध्ये खुसखोरी खपवून घेणार नाही

## आदिवासी संघटनेचा दिग्रस मधे उलगुलान

**दैनिक युवक आधार**
**उमेश साखरकर दिग्रस तालुका प्रतिनिधी**
**दिग्रस**

आदिवासी समाजाला अनुसूचित जमातीचे आरक्षण हे भारतीय संविधानाच्या पाचव्या अनुसूची प्रमाणे देण्यात आले आहे. परंतु अलीकडच्या काळात बंजारा इतर समाज हैदराबाद गॅझेटचा आधार घेत आदिवासी (अनुसूचित जमातीचे )आरक्षण मिळवण्याचा प्रयत्न करत आहे.यास आदिवासी समाजाच्या वतीने दि.१२ सप्टेंबर रोजी तीव्र विरोध करून निवेदन देण्यात आले. हैदराबाद गॅझेटच्या आधारे अनुसूचित जमातीचे आरक्षण देण्याचा प्रयत्न तत्काळ थांबवावा, अनुसूचित जमातीच्या यादीत कुठल्याही नव्या समाजाचा समावेश करण्यापूर्वी संवैधानिक प्रक्रिया, न्यायालयीन दृष्टिकोन व आदिवासी समाजाचा



अभिप्राय घेणे बंधनकारक करावे, इतर समाजांच्या या मागणीस संवैधानिक दृष्ट्या अमान्य करून त्याबाबत शासनाने अधिकृत भूमिका घ्यावी, अनुसूचित जमातीच्या आरक्षणात घुसखोरी सहन करणार नसल्याचेही निवेदनात नमूद आहे.निवेदन मा तहसीलदार दिग्रस यांचे मार्फत मा.महामहीम राज्यपाल महाराष्ट्र राज्य मुंबई,मा. पंतप्रधान भारत सरकार नवी दिल्ली,मा मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य मुंबई,मा आदिवासी विकास मंत्री भारत सरकार नवी दिल्ली,मा सामाजिक न्यायमंत्री महाराष्ट्र राज्य मुंबई,मा आदिवासी विकास मंत्री महाराष्ट्र राज्य मुंबई. यांना निवेदन देण्यात आले. निवेदन देतांना बी.टि कन्नाके साहेब, भिमराव खारोडे,पुरुषोत्तम कुडवे, दिलीप जवादे,गजानन गंडाळे, तुळशीराम तडसे,चक्रे भिम टायगर सेना दिग्रस कांबळे , राजू बोडके,विनोद नाटकर,विनोद कोवे,आनंद बेले,गजानन पवार,ज्ञानेश्वर सुकळकर,राजू नैताम, सिताराम पारधी, मारोती भवाळ,भारत पारधी , नारायण बेले, बाळकृष्ण मानतुटे,गोपाल बोरकर,सौरभ पंदरे, आकाश रणमले,विजय वाघमारे, स्वप्निल पेंदोर, राजीव गोदमले,असे शेकडो आदिवासी बांधव,विषेश करून महिला भगिनींनी यांमध्ये मोठ्या संख्येने सहभाग घेतला.अखिल भारतीय आदिवासी विकास परिषद दिग्रस ,बिरसा क्रांती दल दिग्रस,राष्ट्रीय आदिवासी एकता परिषद दिग्रस,राष्ट्रीय विद्यार्थी परिषद दिग्रस,बिरसा ब्रिगेड दिग्रस, आदिवासी पॅंथर संघटना दिग्रस, आदिवासी कर्मचारी संघटना ,दिग्रस,आदिवासी महिला संघटना दिग्रस,विविध सामाजिक संघटनेचे पदाधिकारी, आणि विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी सहभागी होते.

---

# भारतीय लोक कलाकार सांस्कृतिक संघटना कार्यक्रमाचे उद्घाटन सिहोरा येथे संपन्न

**दैनिक युवक आधार**
**संजीव भांबोरे**

**भंडारा** - तुमसर तालुका भारतीय लोक कलाकार सांस्कृतिक संघटना तुमसरच्या वतीने सिहोरा येथे दोन दिवसीय भारतीय लोक कलाकार सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन १३ व १४ सप्टेंबरला आयोजित करण्यात आलेले आहे. या कार्यक्रमाचे उद्घाटन दिनांक 13 सप्टेंबर 2025 ला सिहोरा येथील प्रथम नागरिक रंजना तुरकर यांचे हस्ते करण्यात आले.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी भंडारा



जिल्हा परिषद सदस्या सुषमा पारधी उपस्थित होत्या. प्रमुख अतिथी दैनिक माझा मराठवाडा विदर्भ विभागीय संपादक तथा ब्ल्यू स्टार्म टीव्ही चॅनेल चे महाराष्ट्र प्रमुख संजीव भांबोरे, गणेश आतीलकर सरगम ग्रुप संचालक, श्रीकांत नागदेवे भंडारा जिल्हाध्यक्ष भारतीय लोक कलाकार सांस्कृतिक संघटना, आर्यन नागदेवे, नंदलाल बनसोड, गणेश मेश्राम भारतीय लोक कलाकार संघटना तुमसर यावेळी प्रामुख्याने उपस्थित होते. सर्वप्रथम सर्व पाहुण्यांच्या उपस्थितीत सर्व महापुरुषांना अभिवादन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. त्यानंतर स्वागत गीत सादर करून सर्व पाहुण्यांचे पुष्पगुच्छ , शाल, सन्मानचिन्ह देऊन सत्कार करण्यात आला.सदर कार्यक्रमात अनेक कलावंतांनी आपली कला सादर केली असून या भारतीय लोककला संस्कृतीक संघटनेच्या माध्यमातून त्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळून एक व्यासपीठ त्यांच्या करिता तयार होते.व त्यातूनच जे खरे कलाकार आहेत त्यांना शासनाकडून मानधन उपलब्ध होते. या कार्यक्रमाकरिता मीनाक्षी पटले, उर्मिला पटले,सुनंदा नेवारे, ममता पटले ,दिंडेश्वरी शुक्ला, व मंडळातील सर्व कार्यकर्ते सहकार्य करीत आहेत.

---

# शिवसेना आपला दारी —बजरंग नगरात जनतेच्या ज्वलंत समस्या

**दैनिक युवक आधार**
**ज्योत्सना करवाडे प्रतिनिधी नागपूर**



**नागपूर** : मानेवाडा परिसरात "शिवसेना आपला दारी" हा उपक्रम जोमात सुरू आहे. वं. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि धर्मवीर आनंद दिघे यांच्या प्रेरणेने, तसेच उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या आदेशानुसार हा उपक्रम राबविला जात आहे. प्रभाग क्रमांक ३२ बजरंग नगरात झालेल्या बैठकीत स्थानिक नागरिकांच्या गंभीर समस्या मांडण्यात आल्या. शिवसेना सामाजिक कार्यकर्ते प्रेम (हितेश) मुंदाफळे यांच्या नेतृत्वात कार्यकर्त्यांच्या शिष्टमंडळाने मनपा हनुमान नगर झोन क्र. ३ चे सहआयुक्त नरेंद्र बावनकर यांना सविस्तर निवेदन सादर केले. निवेदनात असे नमूद करण्यात आले की, बजरंग नगर, बौधिवृष नगर, कैलाश नगर, ज्ञानेश्वर नगर, सावित्रीबाई फुले नगर, विश्वकर्मा नगर, आदिवासी नगर, कौशल्य नगर, ताज नगर, वेळेकर लेआऊट व कुकडे ले आऊट या भागातील रस्त्यांची स्थिती अतिशय दयनीय आहे. गल्ली क्र.१ ते १७ मध्ये रस्त्यांचे डांबरीकरण न झाल्याने खड्डेमय रस्त्यांमुळे अपघातांचा धोका वाढला आहे. नाल्यांचे खोलीकरण व झाकणांची व्यवस्था नसल्याने सांडपाणी रस्त्यावर वाहत आहे. नागरिकांचे आरोग्य धोक्यात येत असून डास व जीवजंतुंची उत्पत्ती वाढतच आहे. नियमित साफसफाई होत नसल्याने केर कचऱ्याचे ढिगारे व दुर्गंधी चा त्रास नागरिकांना त्रासदायक ठरत आहेत. बजरंग नगरातील उद्यानच गायब झाल्याने लहान मुलं व ज्येष्ठ नागरिक गार्डनपासून आज पर्यंत देखिल वंचितच आहेत.

दक्षिण नागपूरातील लोकांच्या आरोग्याला व सुरक्षिततेला धोका निर्माण झाला असून त्वरित उपाययोजना न झाल्यास नागरिकांचा रोष उफाळून येईल, असा इशारा शिवसेना कार्यकर्त्यांनी दिला. राहुल हेडाऊ, प्रवीण इंगोले, सोनू (साहिल) देठे, पंकज इटनकर, मुकेश भंडारी, प्रकाश काळे, श्रीकांत तराळे, अनिल वासनकर यांच्यासह अनेक शिवसैनिक उपस्थित हजर होते. शिवसेनेच्या या उपक्रमामुळे स्थानिक जनतेच्या समस्या थेट समोर येत असून, त्या सोडविण्यासाठी दबाव निर्माण होत आहे. शिवसेना आपला दारी हा उपक्रम घरोघरी राबवित लोकांच्या समस्या जाणून घेत आहे सरकारने आता तरी जागे व्हा आणि ह्या सर्वसमस्याचे पालन करा अशी मागणी केली आहे.

---

# ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या उर्वरित मागण्या तात्काळ मार्गी लावा - संदिप मानकर

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**

**सिल्लोड** :- गावगाडा हाकणारे व ग्रामपंचायतीचा महत्वाचा दुवा समजले जाणारे ग्रामपंचायत कर्मचारी यांच्या प्रलंबित असलेल्या मागण्या मार्गी लावण्यासाठी आमदार अब्दुल सत्तार यांच्या अध्यक्षतेखाली ता.08 सप्टेंबर रोजी सिल्लोड येथे पंचायत समितीचे अधिकारी, कर्मचारी, सरपंच व ग्रामपंचायत कर्मचारी यांची आढावा बैठक संपन्न झाली. या बैठकीत सिल्लोड पंचायत समितीचे गटविकास अधिकारी रत्नाकर पगार यांनी बोलतांना सांगितले की, शासनस्तरावर ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या मागण्या मान्य करण्यासाठी आम्हीं वेळोवेळी पाठपुरावा करुन अहवाल पाठविला आहे आणि त्याच अनुषंगाने बैठकीच्या रोजी सायंकाळी तालुक्यातील 119 ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या खात्यात पहिल्या टप्प्यात मार्च व एप्रिल या दोन महिन्यांचे एकूण 34 लाख 34 हजार 886 रुपये थकित वेतन जमा करण्यांत आले. मात्र वेतनासोबतच ग्रामपंचायत कर्मचाऱ्यांच्या वसुलीची सक्ती, गिपीएफ, व पेन्शन आशा अनेक मागण्या प्रलंबित आहेत त्या तात्काळ मार्गी लावून त्यांना न्याय द्यावा अशी मागणी क्रांतीगुरु लहुजी साळवे विकास परिषदेचे प्रदेश कार्याध्यक्ष संदिप मानकर यांनी आमदार अब्दुल सत्तार यांचे मार्फत शासनाकडे केली आहे. याप्रसंगी नॅशनल सहकारी सूतगिरणीचे चेअरमन अब्दुल समीर, गटविकास अधिकारी रत्नाकर पगार, जिल्हा बँकेचे चेअरमन अर्जुन गाढे, कृउबा समितीचे सभापती विश्वास दाभाडे, उपसभापती संदिप राऊत, देविदास लोखंडे, केशवराव तायडे, रामदास पालोदकर, श्रीरंग साळवे, दुर्गाताई पवार, भाऊराव लोखंडे, संजय डमाळे, मारोती वराडे, सुदर्शन अग्रवाल, प्रशांत क्षीरसागर, किशोर अग्रवाल, गटशिक्षणाधिकारी अनिल पवार, विस्तार अधिकारी साहेबराव शेळके, दीपक गावंडे



यांसोबतच ग्रामपंचायत कर्मचारी संघटनेचे जिल्हाध्यक्ष हरिश्चंद्र सोनवणे, तालुकाध्यक्ष दिपक दांडगे, उपाध्यक्ष रामराव पवार, सचिव सचिन शिंदे, मधुकर तायडे, संदिप झलवार, योगेश पंडित, दत्ता साबळे, सुपडा खंडाळकर, यांचेसहित लोकप्रतिनिधी, पंचायत समितीचे विभागनिहाय अधिकारी, कर्मचारी, तालुक्यातील ग्रामपंचायतींचे सरपंच, ग्रामपंचायत कर्मचारी, संगणक चालक आदींची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# रस्त्यांपासून घरांपर्यंत... जनतेच्या हक्कासाठी सेवा पंधरवडा

### १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर दरम्यान निफाडमध्ये उपक्रमांची मालिका; नागरिकांनी घ्यावा योजनांचा लाभ

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या जन्मदिन (१७ सप्टेंबर) पासून राष्ट्रपिता महात्मा गांधी यांच्या जयंतीपर्यंत (२ ऑक्टोबर) निफाड तालुक्यात छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियानांतर्गत 'सेवा पंधरवडा' उत्साहात साजरा करण्यात येणार आहे. या उपक्रमाचा उद्देश महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख, कार्यक्षम, गतिमान आणि पारदर्शक करण्याचा आहे. यासंबंधीची माहिती प्रांतधिकारी डॉ. शशिकांत मंगरुळे व तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनी दिली.

पहिला टप्पा : पाणंद रस्ते अभियान (१७ ते २२ सप्टेंबर)
पाणंद व शिवार रस्त्यांना क्रमांक देणे
गाव नकाशावर रस्ते चिन्हांकित करणे
सर्वेक्षण करून नोंद नसलेल्या रस्त्यांचा समावेश करणे
शेतरस्त्यांसाठी संमतीपत्रे घेणे
रस्ता अदालत घेऊन प्रलंबित प्रकरणे निकाली काढणे
शेतरस्त्यांची मोजणी व सीमांकन करणे



दुसरा टप्पा : सर्वांसाठी घरे (२३ ते २७ सप्टेंबर)
शासकीय जमीन कब्जेहक्काने उपलब्ध करून देणे
गायरान जमिनीवरील अतिक्रमणे नियमानुकूल करणे
विकास आराखड्याशी विसंगत आरक्षण बदलाचे प्रस्ताव सादर करणे
लाभार्थ्यांना पट्टे वाटप करणे
खासगी मिळकतींसाठीही पट्टे वितरण

तिसरा टप्पा : नावीन्यपूर्ण उपक्रम (२८ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर)
1.गाव तिथे स्मशानभूमी
2.महसूल अदालत
3.कार्यालयीन स्वच्छता
4.आयुष्यमान कार्ड

प्रांतधिकारी डॉ. शशिकांत मंगरुळे यांनी सांगितले की,हा सेवा पंधरवडा केवळ दोन आठवड्यांचा कार्यक्रम नसून महसूल प्रशासनाच्या कामकाजात सातत्याने पारदर्शकता व गतिमानता आणण्याचे हे माध्यम आहे. नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन शासनाच्या योजनांचा लाभ घ्यावा.

तहसीलदार विशाल नाईकवाडे यांनीही नागरिकांना आवाहन केले की, प्रत्येक टप्प्यात राबवल्या जाणाऱ्या उपक्रमांचा थेट फायदा सामान्य जनतेला होणार आहे. त्यामुळे गावागावातून सक्रिय सहभाग आवश्यक आहे.

# भुजलाशयीन पाचपहुर मत्स्य व्यवसाय सहकारी संस्था मर्या,व भुजलाशयीन महिला मत्स्य व्यवसायिक सहकारी संस्था मर्या. मनमानी कार्यविरोधात निवेदन

**दैनिक युवक आधार -**
**घाटंजी तालुका प्रतिनिधि. महेश पेन्दोर**

भुजलाशयीन पाचपहुर मत्स्य व्यवसाय सहकारी संस्था मर्या,व भुजलाशयीन महिला मत्स्य व्यवसायिक सहकारी संस्था मर्या,यांनी जी.आर. चे उल्लघण करून १० किलो मीटर च्या बाहेरील ५ सभासद घेतले आहे तरी त्या सभासदांचे सभासदत्व रद्द करण्याबाबत प्रकरणात त्वरित कारवाई करुन केलेल्या कारवाई ची माहिती अर्जदाराला पुरविण्यात यावी.दोन्ही संस्थेमध्ये ६८ सभासद आहेत त्यापैकी एका संस्थेचा अध्यक्ष प्रकाश बोलेनवार तर दुसऱ्या संस्थेच्या अध्यक्षा सौ.रामगिरवार आहेत यांनी महाराष्ट्र राज्य शासनाच्या जी.आर.प्रमाणे मुळ जन्मताच भोई समाजाच्या लोकांना सभासद करणे आणि १० किलोमीटर आतील लोकांना सभासद करणे जी.आर.प्रमाणे बंधनकारक होते.परंतु भोई समाजातील १० किलोमीटर आतील व्यक्तीना सभासद न करता अध्यक्ष प्रकाश बोलेनवार यांनी आपल्या जवळील मर्जीतील लोकांना जेने करून १० किलोमीटर बाहेरील असुन त्यांना हेतू पुरस्सर सभासद केले त्यांचे नाव खालील प्रमाणे आहे. १) लिंबा गणपत शिवरकार रा.पांढरकवडा २) रमेश गोविंदा शिवरकार रा.पांढरकवडा ३)सुरेश नारायण कार्लेकर रा.पांढरकवडा ४) अरुण संभाजी करलुके रा.तातापुर ५) प्रकाश नारायण पारशिवे रा. खैरगांव यांना जी.आर.चे उल्लघण



करून अध्यक्ष यांनी सभासदत्व दिले आहे काही वर्षापासून पाचपहुर धरण येथे आपल्या मालकीचे हक्क गाजवत आहे तरी १० किलोमीटर आतील त्या धरणाच्या परिसरातील भोई समाजाच्या १०० कुटुंबातीना शासनामार्फत रोजगार मिळवून द्यावे नाही तर या १० किलोमीटर बाहेरच्या लोकांचे सभासदत्व काढून त्याठिकाणी १० किलोमीटर आतील लोकांना सभासदत्व देण्यात यावे अध्यक्ष यांनी या ५ सभासदांना सभासदत्व देते वेळेस कोणत्याही प्रकारचे आधार कार्ड,किलोमीटर अंतरावर प्रमाण पत्र,कागादपत्रे न घेता व कोणत्याही प्रकारची तांत्रिक तपासणी न करता त्यांना सभासदत्व दिले आहे.संबंधित जी.आर.नुसार नियमाची अमलबजावणी न झाल्यास ८ दिवसानंतर भोई समाज युवा मंच महाराष्ट्र यवतमाळ जिल्हा अध्यक्ष श्री.प्रफुल वासुदेव नांन्ने अमरण उपोषण करणार असल्याची माहिती दिली.

# कॉंग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांचे विनोबा भावे यांना अभिवादन!

### गागोदे बुद्रुक येथे विनोबा भावे यांच्या स्मरणार्थ महेंद्रशेठ घरत स्वागत कमान उभारणार!

**दैनिक युवक आधार**
**उलवे, वार्ताहर**

: भूदान चळवळीचे प्रणेते आणि भूदान चळवळीद्वारे भूमिहीनांना जमिनी देणारे, 'भारतरत्न' विनोबा भावे यांची जयंती गुरुवारी (ता. ११) पेण येथील त्यांच्या जन्मगावी
गागोदे बुद्रुक येथे साजरी करण्यात आली. यावेळी कॉंग्रेसचे रायगड जिल्हाध्यक्ष महेंद्रशेठ घरत यांनी विनोबा भावे यांना अभिवादन केले.

यावेळी महेंद्रशेठ घरत म्हणाले, "विनोबा भावे महान होते. त्यांनी जगाला आदर्शवत अशी भूदान चळवळ राबवली. ज्यांना जमिनी नाहीत त्यांना विनोबा भावे यांनी सावकारांकडून जमिनी घेऊन त्या भूमिहीनांना दान केल्या. त्यांची ही भूमिका जगावेगळी आहे. विनोबा भावे आणि




कर्मवीर भाऊराव पाटील यांचा आदर्श मी घेतला. आपल्या ताटातील अर्धी भाकरी दुसऱ्याला देण्याचा. त्यामुळेच स्वतःच्या कमाईतील ४० टक्के कमाई गोरगरिबांवर मी खर्च करतोय. अनेक विद्यार्थ्यांना दत्तक घेऊन शिक्षण आणि नोकरीही दिली. गरिबांच्या घरांना मदत, अनेकांना घरे, गाड्या दिल्यात. हीच दातृत्वाची भावना घेऊन यापुढेही असेच आयुष्य जगणार आहे. "

"गरिबीमुळेच मी राजकारणात आलो. त्यामुळे महिलांच्या डोक्यावरील हंडा उतरवला. शेलघर हे आदर्श गाव बनवले. काम करण्याचा उद्देश चांगला असेल तर निश्चितच यश मिळते. 'जनसेवेसी काया झिजवावी', या उक्तीप्रमाणे सामाजिक संस्थांच्या मी कायम मागे आहे. विनोबांच्या स्मृती कायम राहण्यासाठी त्यांच्या नावाने स्वागत कमान उभारली जाईल. खर्चाची जबाबदारी मी घेतो," असे आंतरराष्ट्रीय कामगार नेते महेंद्रशेठ घरत यावेळी म्हणाले.

यावेळी सर्वोदय चळवळीचे ज्येष्ठ नेते बापूसाहेब नेने, शिवाजीदादा कागणीकर, डॉ. श्रीराम जाधव आदी मान्यवर उपस्थित होते.

महाराष्ट्र प्रदेश कॉंग्रेसचे सरचिटणीस मिलिंद पाडगावकर, श्रद्धा ठाकूर, वैभव पाटील, मार्तंड नाखवा आणि सर्वोदय चळवळीचे कार्यकर्तेही मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# श्रीवर्धन किनाऱ्यावर लाखो रुपयांचा गांजा जप्त – दिघी सागरी पोलिसांची मोठी कारवाई

**दैनिक युवक आधार**
**श्रीवर्धन तालुका प्रतिनिधी - अनिकेत मोहित**

**श्रीवर्धनः** दिघी सागरी पोलिस ठाण्याच्या हद्दीत मोठ्या प्रमाणात लागू केलेल्या साहित्याचा साठा जप्त करण्यात आला आहे. ११ सप्टेंबर २०२५ रोजी दुपारी १२:३० वाजता, एका अज्ञात व्यक्तीने अवैधरित्या लागू केलेल्या मनेरी नानवली गावाच्या हद्दीत ११ किलो ९६६ ग्रॅम गांजा पोलिसांनी बेकायदेशीरपणे समुद्रकिनाऱ्यावर फेकला. या लागू केलेल्या उत्पादनांची बाजारभाव किंमत ₹५९ लाख ८३ हजार इतकी असल्याचे मानले जाते.




या प्रकरणात, दिघी मरीन पोलिस ठाण्याचे गुरना. ६१/२०२५ नुसार एन. डी. पी. एस. कायदा १९८५ च्या कलम ८(क), २०(ब)(ii)क, २२(क) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलिसांनी परदेशातून गांजा आणून किनाऱ्यावर फेकल्याचा संशय व्यक्त केला आहे, तर मागील टोळी आणि संबंधित आरोपींचा शोध घेण्यासाठी तपास चक्रे वेगाने फिरत आहेत.

तपास सपोनि श्री. हनुमंत शिंदे हे हे काम करत आहेत. या कारवाईमुळे परिसरात एकच खळबळ उडाली असून स्थानिक नागरिकांनी पोलिसांचे कौतुक केले आहे.

# उरण –जेएनपीटी महामार्गावरील खड्डे बुजवण्याची युवा सेनेची मागणी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर** : पनवेल तालुक्यातील कोन गाव ते जे.एन.पी.टी. हायवे दरम्यान महामार्गावर पडलेल्या खड्ड्यांसंदर्भात युवासेना पनवेल तालुका अधिकारी निखिल भोपी यांनी आपल्या सहकाऱ्यांसह एन.एच.ए.आयच्या प्रकल्प संचालक अजय यादव यांची भेट घेऊन तातडीने सर्व खड्डे तसेच अडथळे दूर करण्याची मागणी केली. कोनगाव उरण जेएनपीटी हा महामार्ग उरण पनवेल तालुका परिसरातील अत्यंत महत्त्वाचा मार्ग आहे. मात्र गेल्या अनेक महिन्यांपासून या महामार्गावरील खड्ड्यांमुळे नागरिकांचे, कामगारांचे व वाहनधारकांचे हाल होत आहेत. मोठ–मोठे खड्डे आणि उखडलेला रस्ता पृष्ठभागामुळे दररोज अपघात होत असून अनेकांना जीव गमववा लागला आहे. येत्या सात दिवसात येथील सर्व खड्डे न बुजवल्यास माजी आमदार तथा शिवसेना



जिल्हाप्रमुख मनोहर भोईर आणि युवासेना जिल्हा अधिकारी पराग मोहिते यांच्या नेतृत्वाखाली युवा सेना उरण विधानसभेतर्फे एन.एच.ए.आय विरोधात शिवसेना स्टाईल आंदोलन छेडले जाईल असा इशारा निखिल भोपी यांनी दिला. यावेळी करंजाडे उपशहर अधिकारी गौरव पांडे आणि इतर शिवसैनिक उपस्थित होते. (फोटो)

# कांद्याचे दर घसरल्याने विंचूरला शेतकऱ्यांचा रास्ता रोको

**दैनिक युवक आधार**
**निफाड तालुका प्रतिनिधी राजेश भडांगे**

विंचूर उपबाजार समितीत कांद्याच्या दरात मोठी घसरण झाल्याने उत्पादन खर्च निघेनासा झाला आहे. यामुळे शेतकऱ्यांमध्ये संतापाची लाट उसळली असून, दि. १३ सप्टेंबर रोजी शनिवारी सकाळी ९.३० वाजता विंचूर–संभाजीनगर–नाशिक महामार्गावर शेतकऱ्यांनी जंगी रास्ता रोको आंदोलन छेडले. या आंदोलनात पंचक्रोशीतील शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. "कांद्याला योग्य भाव द्या", "शेतकरी हिताचे धोरण राबवा", "सरकार होशात या" अशा घोषणांनी परिसर दणाणून गेला. सध्या बाजारात सरासरी कांद्याला केवळ २०० ते ३०० रुपये दर मिळत असून, उत्तम प्रतीच्या



कांद्यालाही फक्त ८०० ते १००० रुपयांचा भाव मिळतोय. महागडी बियाणे खरेदी करून दुबार रोपवाटिका तयार करताना शेतकऱ्यांनी मजुरटंचाई आणि वाढती मजुरी यांचा सामना केला. मात्र एवढा खर्च करूनही दर घसरल्याने शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. आंदोलनाची माहिती मिळताच पोलिसांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. विंचूर पोलिस ठाण्याचे अधिकारी व कर्मचारी यांनी मोठा बंदोबस्त ठेवून वाहतूक सुरळीत करण्याचा प्रयत्न केला. काही काळ महामार्गावरील वाहतूक ठप्प झाली होती.

यावेळी उपस्थित शेतकरी नेत्यांनी इशारा दिला की, "कांद्याला हमीभाव मिळाला नाही तर येत्या काळात आणखी तीव्र आंदोलन छेडले जाईल."

# पोस्को महाराष्ट्र स्टील तर्फे शेतकऱ्यांचा अभिनव फार्मर्स क्लब पुणे येथे अभ्यास दौरा..

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी माणगांव रायगड सचिन पवार**

माणगांव :-दि. १२ ऑगस्ट व दि. ९ सप्टेंबर २०२५ रोजी पोस्को महाराष्ट्र स्टीलच्या सीएसआर उपक्रमांतर्गत, गोरेगांव आणि इंदापूर विभागातील प्रगतशील शेतकऱ्यांचा अभ्यास दौरा पुणे येथील अभिनव फार्मर्स क्लब येथे आयोजित करण्यात आला. या अभ्यास दौऱ्याचा प्रमुख उद्देश शेतकऱ्यांना नव्या शेती तंत्रज्ञानाचा प्रत्यक्ष अनुभव देणे, शेतकऱ्यांना रासायनिक खत वापराकडून सेंद्रिय शेतीकडे वळवणे तसेच त्यांच्या उत्पन्नात आणि उत्पादनात वाढ कशी करावी याची माहिती देणे हा होता. पहिल्या टप्प्यात कृषी विस्तार अधिकारी पंचायत समिती माणगांव यांनी निवडलेले १६ प्रगतिशील शेतकरी सहभागी झाले, तर दुसऱ्या टप्प्यात माणगांव मधील रायगडचा शेतकरी राजा एफपीओ मधील १४ शेतकरी सहभागी झाले. यात ८ महिला शेतकऱ्यांचाही समावेश होता.




अभिनव फार्मर्स क्लब हा सेंद्रिय शेतीचा अग्रणी असून, रासायनिक खतांचा व कीटकनाशकांचा वापर टाळून नैसर्गिक व पर्यावरणपूरक शेती पद्धतींचा प्रसार करण्याचे मार्गदर्शन येथे केले जाते. या दौऱ्यात शेतकऱ्यांना पॉलीहाऊस तंत्रज्ञान, सेंद्रिय खतांचा वापर, रासायनिक खतांचा वापर कमी करून उत्पादनात वाढ कशी करावी याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले. एक एकर शेतीत विविध प्रकारची पिके घेऊन उत्पादन वाढविण्याचे मॉडेलही शेतकऱ्यांना दाखवण्यात आले.

अभिनव फार्मर्स क्लबचे अध्यक्ष श्री. ज्ञानेश्वर बोडके यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधत सेंद्रिय शेती व बाजारपेठेत उत्पादनाला चांगला भाव मिळविण्याच्या पद्धती समजावून सांगितल्या. त्यांनी शेतकऱ्यांना आवश्यक त्या सर्व मदतीचे आश्वासन दिले.

"फक्त पिकवून चालत नाही, तर ते कुठे आणि कसे विकायचे हे समजणे देखील महत्त्वाचे आहे," असे मार्गदर्शन करताना श्री. बोडके म्हणाले.

या दौऱ्यामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या पारंपरिक शेतीत सुधारणा करून नवीन तंत्रज्ञान अवलंबण्याची नवी दिशा मिळाली. त्यांनी जमिनीच्या गुणवत्तेत सुधारणा कशी करावी, सेंद्रिय शेतीला चांगला प्रतिसाद कसा मिळवावा व उत्पादनाला बाजारपेठेत चांगला भाव कसा मिळेल याबाबत सखोल मार्गदर्शन मिळाले.

शेतकऱ्यांनीही हा दौरा प्रेरणादायी व उपयुक्त असल्याचे सांगितले. पोस्को महाराष्ट्र स्टीलच्या या उपक्रमामुळे शेतकऱ्यांचा आत्मविश्वास वाढेल व आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यासाठी हा एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरेल.

# खासदार संजय जाधव व खासदार कल्याण काळे यांनी आढावा बैठकीत अधिकाऱ्यांना धरले धारेवर...

**दैनिक युवक आधार**
**परतूर-जालना(अशोक ठोके)**

परभणी लोकसभेचे खासदार संजय जाधव व जालना लोकसभेचे खासदार कल्याण काळे यांच्या उपस्थितीत परतूर तहसील कार्यालयात आढावा बैठक पार पडली. परतुर मंठा विधानसभा मतदारसंघातील प्रलंबित कामाची आढावा बैठक परभणी लोकसभेचे खासदार संजय जाधव यांच्या अध्यक्षतेखाली कृषी विभाग, बांधकाम विभाग, पंचायत समिती सह सर्व शासकीय विभागाच्या कामकाजाचा आढावा घेणारी महत्त्वपूर्ण बैठक होती.या बैठकीत नागरिकांनी परतुर तालुक्यातील शासकीय विभागाचे अधिकारी यांच्या एकाधिकारशाहीच्या विरोधात प्रलंबित प्रश्न व समस्यांबाबत महत्त्वाचे मुद्दे उपस्थित केले.



या बैठकीला मार्गदर्शन करताना खा. संजय जाधव यांनी सर्वच विभागाच्या कामकाजावर चर्चा करताना,प्रलंबित प्रकरणे तातडीने निकाली काढण्याचे निर्देश अधिकाऱ्यांना दिले. यावेळी त्यांनी सर्वप्रथम उपस्थित शेतकऱ्यांचे प्रश्न यामध्ये विहिरीचे प्रश्न व सर्वात मोठा घोटाळा असलेल्या घरकुलाच्या मुद्यांवर तातडीने कारवाई करण्याचे आदेश दिले व हे सर्व प्रश्न लवकरात लवकर मार्गी लावण्याच्या सुचना उपस्थित अधिकाऱ्यांना दिल्या. या बैठकीत घरकुलाचा मुद्दा खूप गाजला. डॉ. प्रदीप चव्हाण यांनी विचारलेल्या प्रश्नांना कोणालाच उत्तर देता आले नाही. या प्रसंगी बैठकीला उपस्थित उपविभागीय अधिकारी, गटविकास अधिकारी, कृषी अधिकारी भूमी अभिलेख विभागाचे अधिकारी आणि इतर संबंधित अधिकारी तसेच शिवसेना जिल्हाप्रमुख महेश भैय्या नळगे, उपजिल्हाप्रमुख माधवराव मामा कदम, अशोक आघाव, परतुर तालुकाप्रमुख भारत पंडित, मंठा तालुकाप्रमुख प्रदिपभाऊ बोराडे, उपतालुकाप्रमुख रामचंद्र काळे, शहरप्रमुख विठ्ठलराव वटाणे, दत्ता सुरूंग, युवासेना तालुकाप्रमुख प्रमोद खंदारे, दलित आघाडी तालुकाप्रमुख मधुकर पाईकराव, अनंतराव वैद्य, आबासाहेब कदम, माऊली राजबिंडे, उपसरपंच दिपक काळे, संदिप पाचारे, गजानन सोनवणे, राहुल कदम,विजय बोरुडे, गणपत खोसे, गोपाल माने सोबत कॉंग्रेस चे महाराष्ट्र युवक सरचिटणीस अन्वर बापू देशमुख, शहर अध्यक्ष गणेश कुलकर्णी, एकनाथ कदम, डॉ. प्रदीप चव्हाण, आघाडीचे आजी माजी सरपंच, पं. समिती सदस्य व मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते.